यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

'ज्ञानगंगोत्री', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - 422 222

शिक्षणशास्त्र विद्याशाखा

प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका

शैक्षणिक वर्ष : जानेवारी २०२५

विद्यापीठ गीत



एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ।। धृ ।।

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ।। २ ।।

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जेथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

कुसुमाग्रज

निर्मिती

श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

© २०२५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- प्रथम प्रकाशन : जानेवारी २०२५
- प्रकाशक : श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

Shardul / AF24-191

शिक्षणशास्त्र विद्याशाखा : प्रमाणपत्र शिक्षणक्रम माहितीपुस्तिका २०२४–२५

अनुक्रमणिका

१. विद्याशाखेचा परिचय ४
२. बालसंगोपन आणि रंजन शिक्षण (C31) : शिक्षणक्रमाविषयी ४
३. स्वयं–सहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम : मूलभूत (C105) १३
४. घरकामगार कौशल्य विकास (E36) प्रमाणपत्र : शिक्षणक्रमाविषयी १६

विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची सूचना

विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांचे छापील स्वयं–अध्ययन साहित्य प्रवेश घेतलेल्या अभ्यासकेंद्रावरून अंतिम लेखी परीक्षेपूर्वी घेऊन जावे. परीक्षा झाल्यानंतर आपला छापील स्वयं–अध्ययन साहित्यावर कोणताही हक्क राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

■ Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबतची सूचना

सर्व शिक्षणक्रमाच्या विद्यार्थी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपणास Academic Bank of Credits - ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, पदविका, पदवीची माहिती Digilocker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडिट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits - ID नोंदणी *http://www.abc.gov.in* या पोर्टलवर करता येईल. किंवा आपल्या विद्यापीठाच्या *www.ycmou.ac.in* या वेबसाईट्ला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटणाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits - ID तयार करण्यासंबंधी माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

■ शिक्षणक्रमाला २० पेक्षा कमी प्रवेश झाल्यास असा शिक्षणक्रम सन २०२४ या शैक्षणिक वर्षासाठी स्थगित ठेवण्याचा अधिकार विद्यापीठाकडे असेल. ज्या विद्यार्थ्यांनी सदर शिक्षणक्रमास प्रवेश घेतलेला असल्यास अशा विद्यार्थ्यांना त्यांचे संपूर्ण शुल्क परत देण्यात येईल.

१. विद्याशाखेचा परिचय

या विद्यापीठात एकूण आठ विद्याशाखा आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात शिक्षणशास्त्र विद्याशाखेची स्थापना झाली. त्यानंतर शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपले नाव संपूर्ण महाराष्ट्रात उज्ज्वल करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात केली. आज संपूर्ण महाराष्ट्र शिक्षणशास्त्र विद्याशाखेकडे नेतृत्वाच्या दृष्टीने पाहतो. अद्ययावतता, गतिमानता आणि नवोपक्रमांचे स्वागत ही या विद्याशाखेची वैशिष्ट्ये.

शिक्षणशास्त्र विद्याशाखेने आपल्या कार्यास सुनिश्चितरित्या आणि गुणवत्ता राहावी या दृष्टीने विद्याशाखेचे गुणवत्ता धोरण, व्रतविधान आणि उद्दिष्टे निश्चित केली. त्या अनुषंगाने विद्याशाखेत प्रमाणपत्रापासून संशोधनापर्यंत अनेक शिक्षणक्रम टप्प्या-टप्प्याने सुरू झाले. विद्याशाखेच्या स्थापनेनंतर अवघ्या एक वर्षात (१९९१) दूरशिक्षणाद्वारे बी. एड. शिक्षणक्रम सुरू करणारे संपूर्ण भारतातील हे पहिले मुक्त विद्यापीठ होय. त्यानंतर ह्या विद्याशाखेने अवघ्या दहा-पंधरा वर्षांत एम. फिल. शिक्षणशास्त्र (२००७), एम. फिल. शारीरिक शिक्षण (२००७), एम. एड. (१९९४), एम. ए. शिक्षणशास्त्र (२००७), बी.ए. (ई-एज्युकेशन : २००९) असे उच्च पदवी शिक्षणक्रम सुरू केले. एवढेच नव्हे तर विद्यापीठाच्या ध्येयास सुसंगत असे तळागाळातील लोकांपर्यंत पोहचवणारे स्वयं-साहाय्य गट बांधणी (२००२), बालसेविका (२००२), मूल्य शिक्षण, आशययुक्त अध्यापन पद्धती, चर्मकला कौशल्य विकसन यांसारखे प्रमाणपत्र शिक्षणक्रमही कार्यान्वित केले. शिक्षणाची गुणवत्ता वाढावी यासाठी मुख्याध्यापकांसाठी शालेय व्यवस्थापन पदविका तर माध्यमिक शिक्षकांसाठी सेवांतर्गत प्रशिक्षणांचे आयोजन केले. 'ज्ञानगंगा घरोघरी' पोहचवण्याच्या दृष्टीने संपूर्ण महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात अभ्यासकेंद्रे स्थापन केली.

मुक्त विद्यापीठाची शिक्षणपद्धती दूरशिक्षणाची असते, तर ह्या विद्याशाखेत प्रवेश घेणारे विद्यार्थी सेवांतर्गत असतात. ह्याचा विचार करून शिक्षणक्रमांची व त्यातील प्रात्यक्षिकांची रचना केली. प्रत्येक प्राप्त अनुभव वास्तविक स्तरावर पडताळून पाहता यावा यासाठी विशेष प्रात्यक्षिकांचे नियोजन केले. त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व तज्ज्ञांच्या मदतीने मुद्रित-अमुद्रित साहित्य तयार केले. ह्या विद्याशाखेतील शिक्षणक्रम व्यावसायिक असतात. त्याचा विचार करता अभ्यासकेंद्रांवर शिक्षणक्रमातील विशिष्ट प्रात्यक्षिके मार्गदर्शनाखालीच करता यावी, त्याचा सराव व्हावा या दृष्टीने संपर्कसत्रांचे आयोजन केले.

मुक्त विद्यापीठातील शिक्षणशास्त्र विद्याशाखा अनेकविध पुरस्कारांनी विभूषित आहे हे सांगण्यास आम्हाला आनंद होतो. आंतरराष्ट्रीय पुरस्कारात डॉ. अनंत जोशी, माजी संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांना COL कडून मिळालेला जीवनगौरव पुरस्कार, श्रीमती वानखेडे स्वाती, बी. एड., एम. एड. ची विद्यार्थिनी ह्यांना COL कडून मिळालेला Award of Excellence for D.E. ह्यांचा समावेश होतो. तसेच येथील प्राध्यापक वर्गासही राष्ट्रीय व राज्य पातळीवरील वैयक्तिक पुरस्कार मिळालेले आहेत.

२. बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C31) : (Early Childhood Care & Education)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात बालसेविका प्रमाणपत्र शिक्षणक्रम २००२ मध्ये सुरू करण्यात आला. केंद्र शासनाने ९३ वी घटनादुरुस्ती करताना फक्त ६ ते १४ वर्षे वयोगटाच्या मुला-मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारलेली आहे. तथापि, अडीच ते साडेपाच वर्षे वयोगटाच्या बालकांच्या विकासाबाबत केंद्र शासन व राज्यशासन कोणत्याही प्रकारची निश्चित अशी जबाबदारी स्वीकारण्यास तयार नाही. त्यामुळे संपूर्ण देशात व महाराष्ट्र राज्यात देखील एकंदरीतच बालविकासाची अत्यंत हेळसांड होत आहे. बालशिक्षण क्षेत्रात जरी विविध प्रकारच्या संस्था विविध प्रकारे कार्यरत असल्या तरी त्यांच्या कार्यात एकवाक्यता व एकसूत्रता आढळून येत नाही अशी वस्तुस्थिती आहे. या परिस्थितीचा विचार करून यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने बालशिक्षण क्षेत्रात एकसूत्रता निर्माण व्हावी या उदात्त हेतूने प्रस्तुत बालसेविका प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरू केलेला आहे. त्यामुळे या शिक्षणक्रमात सहभागी होणाऱ्या, सेवेत असलेल्या व सेवेत नसलेल्या अशा सर्वांनाच बालविकासाचे शास्त्रीय ज्ञान व कौशल्य प्राप्त होण्याची संधी मुक्त विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेली आहे. आतापर्यंत या विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांसाठी अनेक विद्यार्थ्यांनी नावे नोंदविलेली आहेत. आपणदेखील आज त्यात सहभागी होत आहात ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. बालशिक्षण क्षेत्रात, बालविकासाच्या शास्त्रशुद्ध ज्ञानाची व कौशल्याची गरज लक्षात घेऊन या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या असंख्य बालसेविकांच्या प्रशिक्षणासाठी मुक्त विद्यापीठाने ही सुविधा महाराष्ट्रात प्रथमच उपलब्ध करून दिलेली आहे. प्रस्तुत शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर आपल्या कार्याचे आपणांस शास्त्रीय ज्ञान मिळून त्यामुळे निश्चितच बालविकासासाठी उपयोग करण्याचे कौशल्य प्राप्त होईल असा विश्वास मुक्त विद्यापीठास वाटतो. २००९ पासून ह्या शिक्षणक्रमाचे नामांतर बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम असे केलेले आहे. ह्या शिक्षणक्रमास आपण प्रवेश घ्यावा व शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण करावा यासाठी आपणांस हार्दिक शुभेच्छा !

शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

महाराष्ट्रात विविध शासकीय व अशासकीय संस्था बालशिक्षणाच्या क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत आहेत. मात्र या शिक्षणक्रमास शिकविणारे प्रशिक्षित

कार्यकर्ते पुरेशा प्रमाणात उपलब्ध होऊ शकत नाहीत. अनेक खेड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण न घेतलेल्या किंवा अल्प कालावधीचा प्रशिक्षण वर्ग पूर्ण करणाऱ्या व्यक्ती बालवाड्या चालवताना दिसतात. कोणतीही डी.एड. शिक्षिका कायमस्वरूपी 'बालवाडी शिक्षिका' म्हणून ग्रामीण भागात काम करण्यास फारशी उत्सुक नसते. तसेच काही ठिकाणी बालशिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या एखाद्या मध्यवर्ती संस्थेच्या पर्यवेक्षण व नियंत्रणाखाली इयत्ता आठवी ते इयत्ता दहावी पास मुली खेड्यांमध्ये बालशिक्षणाचे कार्य करतात. भारत सरकारच्या एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत निरनिराळ्या तालुक्यांतून अंगणवाड्या तसेच बालवाड्या चालविल्या जातात. येथे काम करणाऱ्या कार्यकर्त्या ह्या पूर्णत: दाई नसतात किंवा बालशिक्षिकाही नसतात. तर त्या प्रामुख्याने साहाय्यिकेचे कार्य करत असतात. म्हणून बालविकासावर भर देणारा एक शिक्षणक्रम विद्यापीठाने विकसित केला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात ह्या कार्याला एकवाक्यता येईल आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने हा शिक्षणक्रम राबविता येईल.

बालसंगोपन आणि रंजन शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

(१) बालविकास क्षेत्रातील पाश्चात्त्य व भारतीय शिक्षणतज्ज्ञांच्या योगदानाचा अल्प परिचय विद्यार्थ्यांना करून देणे व त्यांच्या कार्याचे बालविकासाच्या दृष्टीने महत्त्व विद्यार्थ्यांवर बिंबविणे.

(२) बालविकासाच्या सर्वांगीण प्रक्रियेची मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रशिक्षणार्थ्यांना तोंडओळख करून देणे.

(३) बालविकासाच्या संदर्भात अध्ययनप्रक्रियेचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे.

(४) बालकांचा आहार व आरोग्यासंदर्भात शास्त्रशुद्ध माहिती प्राप्त करून त्याचा बालविकासासाठी उपयोग करून घेण्यास मदत करणे.

(५) बालविकासाची तत्त्वे, बालविकास, मानसशास्त्र, आहार, आरोग्य ह्यांचे स्वरूप स्पष्ट करून त्या अनुषंगाने कार्यवाही व मूल्यमापनाची क्षमता प्रशिक्षणार्थ्यांत विकसित करणे.

(६) खेळवाडी व अंगणवाडी, बालवाडी, इत्यादींच्या आयोजनासाठी कार्यपद्धतीचे आवश्यक ते नियोजन व व्यवस्थापन ह्यांसंबधी मार्गदर्शन करणे.

(७) स्थानिक परिसर व उपलब्ध साधनसामग्रीसह परिणामकारक व कार्यक्षमतेने बालविकास केंद्र, खेळवाडी व तत्सम उपक्रम चालविण्याची क्षमता विकसित करणे.

(८) बालसंगोपन आणि रंजन शिक्षण कार्यकर्तीकडे आवश्यक असणाऱ्या वैशिष्ट्यांची जाणीव करून देणे.

२.१ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) अभ्यासक्रम – ४

(आ) कालावधी – ०६ महिने

(इ) एकूण श्रेयांक – १६ तात्त्विक – (४ श्रेयांक प्रत्येक अभ्यासक्रम)

(ई) एकूण अध्ययन तास : ४८० ते ५६० तास

(उ) **एकूण गुण ४०० गुण**

■ शिक्षणक्रमाचे स्वरूप

तात्त्विक भाग : अभ्यासक्रम (एकूण ४)

EDU 131: बालविकासाची मूलतत्त्वे, बालविकास व बालमानसशास्त्र (Basic principles of child care education and psychology)

घटक १ : बालविकास व बालमानसशास्त्र

घटक २ : बालशिक्षणाची मूलतत्त्वे आणि सिद्धांत

घटक ३ : सहजप्रवृत्ती, अध्ययन प्रक्रिया आणि बालकांचे शिक्षण

घटक ४ : बालकाचा शारीरिक व कारक विकास

घटक ५ : बालकाचा भाषिक विकास

घटक ६ : बालकाचा भावनिक व सामाजिक विकास

घटक ७ : बालकाचा सर्जनशील व सौंदर्यदृष्टीचा विकास

घटक ८ : बालकाचा बौद्धिक विकास

EDU 132: बालशिक्षण : बाल आहार व आरोग्य (Diet and Health of Child)

घटक १ : बालकाचे आरोग्य

घटक २ : बालकाचा आहार

घटक ३ : बालकाची शारीरिक वाढ व मानसिक आरोग्य

घटक ४ : बालकाच्या आरोग्य व आहाराशी संबंधित सवयी व वर्तने

घटक ५ : बालकाची, परिसराची व अन्नपाण्याची स्वच्छता

घटक ६ : बालकाचे नेहमीचे आजार

घटक ७ : अपघात आणि प्रथमोपचार

घटक ८ : बालकांची वैद्यकीय तपासणी व्यंगासंबंधी पालकसंपर्क

EDU 133: बालशिक्षण कार्यपद्धती
(Functioning of child Education)

घटक १ : बालशिक्षण कार्यपद्धतीचे मार्गदर्शक तत्त्वे

घटक २ : शारीरिक व कारक विकासासाठी कार्यपद्धती

घटक ३ : भाषिक विकासासाठी कार्यपद्धती

घटक ४ : सामाजिक, भावनिक आणि सहजप्रवृत्तीच्या विकासासाठी कार्यपद्धती

घटक ५ : जीवन व्यवहाराची कार्यपद्धती

घटक ६ : सर्जनशीलतेच्या विकासासाठी कार्यपद्धती

घटक ७ : कलानुभवाची कार्यपद्धती

घटक ८ : विज्ञान व परिसर अभ्यासासाठी कार्यपद्धती

EDU 134: बालशिक्षणाचे व्यवस्थापन व मूल्यमापन
(Organisation and evaluation of child education)

घटक १ : केंद्राचे व्यवस्थापन व संघटन

घटक २ : भौतिक सुविधा व परिसर

घटक ३ : साहित्य निर्मिती, देखभाल व दुरुस्ती

घटक ४ : केंद्रातील विविध अभिलेख, फाईल व नोंदी

घटक ५ : मानवी संबंध

घटक ६ : व्यापक नियोजन

घटक ७ : अल्पकालीन शैक्षणिक नियोजन

घटक ८ : मूल्यमापन

२.२ अध्ययन पद्धती

प्रस्तुत शिक्षणक्रमासाठी विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रामार्फत प्रशिक्षणार्थींना स्वयं-अध्ययन साहित्य पुरविण्यात येईल. सदर अध्ययन साहित्याची सॉफ्टकॉपी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करावा. या शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे तात्त्विक पाठयक्रमांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, प्रात्यक्षिके, इत्यादी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करावयाची आहेत. स्वाध्याय लेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्‌बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी संपर्कसत्रे आयोजित केली जातील. त्याबाबत सविस्तर तपशील वेळोवेळी पत्राने अभ्यासकेंद्रांना कळविण्यात येईल व अभ्यासकेंद्रामार्फत अध्ययनार्थींना कळविले जाईल. याशिवाय महाराष्ट्रातून वेगवेगळ्या भागातून आलेल्यांचे अभ्यासगट करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

संपर्कसत्राचे आयोजन व प्रशिक्षणार्थींची उपस्थिती

बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी हा व्यावसायिक शिक्षणक्रम असल्यामुळे त्याच्या सर्व प्रकारच्या कार्यासाठी योजनाबद्ध संपर्कसत्राची आवश्यकता आहे. ही संपर्कसत्रे विद्यापीठाने काळजीपूर्वक निवडलेल्या अभ्यासकेंद्रावर आयोजित होतील. या विद्यापीठाने तयार केलेल्या वेळापत्रकानुसार संपर्कसत्रांचे आयोजन करण्यात येईल. संपर्कसत्रातील विषयतज्ज्ञांची उपस्थिती व सहभाग अत्यावश्यक समजला जाईल. त्याचप्रमाणे संपर्कसत्रात शिक्षणक्रमाचा तात्त्विक भाग, शिक्षणातील व्यवहार व प्रात्यक्षिके यांमधील परस्परसंबंध राखता यावा, तत्त्वांचा, व्यावहारिक उपयोजनांचा कार्यभाग सहजपणे शक्य व्हावा, व्यवहारातून तत्त्वांची संकल्पना दृढ व्हावी या पद्धतीने संपर्कसत्रांचे वेळापत्रक व आयोजन करण्यात येते.

२.३ प्रवेश प्रक्रिया

प्रवेश पात्रता

(अ) शैक्षणिक अर्हता

(१) उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (H.S.C.) उत्तीर्ण किंवा

(२) मुक्त विद्यापीठाची पूर्वतयारी प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण किंवा

(३) स्वयं साहाय्य प्रेरक-प्रेरिका (S.H.G.) परीक्षा उत्तीर्ण किंवा

(४) इतर विद्यापीठात बी. ए./बी. कॉम./ बी. एस्सी. करणारे विद्यार्थी ह्या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यास पात्र आहेत.

(आ) अनुभवी व्यक्तीस पात्रता

बालशिक्षण/बालसंगोपन क्षेत्रात किमान एक वर्षाचा अनुभव असणाऱ्या व्यक्तीस प्रवेश पात्रता S.S.C. उत्तीर्ण.

(इ) वय

(१) किमान १८ वर्षे पूर्ण असणारी व्यक्ती (महिला किंवा पुरुष)

(ई) प्रवेश निवड

पात्र व्यक्ती प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश या तत्त्वानुसार एकूण ५० अध्ययनार्थीस प्रवेश देण्यात येईल. (अभ्यास केंद्र सुरू ठेवण्यासाठी किमान १० अध्ययनार्थीस प्रवेश आवश्यक आहे. त्यापेक्षा विद्यार्थी संख्या कमी असल्यास त्यांचे प्रवेश विद्यापीठाच्या नियमानुसार जवळच्या केंद्रावर देण्यात येईल.)

२.४ शिक्षणक्रम शुल्क

तपशील		शुल्क रु.
	Part-A	
१.	नोंदणी शुल्क	२००/-
२.	पात्रता शुल्क	१००/-
३.	ओळखपत्र शुल्क	१०/-
४.	माहितीपुस्तिका शुल्क	५०/-
५.	ई-सुविधा शुल्क	६०/-
६.	ॲल्युमनी शुल्क	१०/-
	Part-B	
१.	विद्यापीठ शुल्क रु. ६७५ + अभ्यासकेंद्र शुल्क रु.५७५/-	१,२५०/-
२.	परीक्षा शुल्क	७२०/-
	एकूण शुल्क	**२,४००/-**

०१. अध्ययनार्थीने संपूर्ण शुल्क रू. २,४००/- ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन पद्धतीनेच भरावे.

०२. अभ्यासकेंद्र शुल्क हिस्सा विद्यापीठकडून प्रवेशित अध्ययनार्थीनुसार एकत्रीतपणे पाठवण्यात येईल.

०३. अध्ययनार्थीने वरील शुल्का व्यतिरिक्त जादा शुल्क देऊ नये. जादा शुल्क दिल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची अध्ययनार्थ्यांनी नोंद घ्यावी.

२.५ कालावधी

प्रस्तुत शिक्षणक्रम दूरस्थ अध्यापनपद्धतीद्वारे आयोजित केला जाणार असून नोंदणीपासून परीक्षेपर्यंतचा कालावधी ६ महिन्याचा राहील व अधिकतम कालावधी २ वर्षांपर्यत असेल. नापास/अनुपस्थित असणाऱ्यास प्रवेशापासून २ वर्षांच्या आत हा शिक्षणक्रम रु. १००/- प्रतिसंपर्कसत्र दिवस अतिरिक्त शुल्क भरून करता येईल. ज्यांना हा शिक्षणक्रम कमाल कालावधीत (दोन वर्षात) पूर्ण करता आला नाही त्यांना पुनर्नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल. त्यासाठी त्यावर्षी असणारे या शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी त्यापुढील दोन वर्षांकरिता करता येईल. ही पुनर्नोंदणी फक्त एकदाच करता येईल. (पुनर्नोंदणी कालावधी प्रथम नोंदणी कालावधीची मुदत संपल्याच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.)

संपर्कसत्र कालावधी

एकूण ०७ दिवस रोज घड्याळी ६ तासाप्रमाणे एकूण ४२ तास उद्‌बोधनसत्र २ दिवस (शिक्षणक्रमाचे स्वरूप व साहित्य वाटप, इत्यादी) व मुख्य संपर्कसत्र ५ दिवस.

संपर्कसत्राचा कार्यक्रम व उपस्थिती

या शिक्षणक्रमासाठी अभ्यासकेंद्रावर एकूण तीन संपर्कसत्रे घेण्यात येतील.

(१) उद्‌बोधन (०२ दिवस)

या संपर्कसत्रात मुक्त विद्यापीठ, विद्यापीठातील विविध शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्र इत्यादी संदर्भात माहिती आणि सर्व अभ्यास विषयांची ओळख करून देण्यात येईल. तसेच पुढील कार्यक्रमाचा परिचय करून देण्यात येईल.

(२) मुख्य संपर्कसत्र (०५ दिवस)

ह्या संपर्कसत्रात केंद्रावरील तज्ज्ञ समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली काही कार्ये पूर्ण करून घेतले जाईल आणि सर्व सैद्धांतिक विषयाचे समंत्रण होईल. संपर्कसत्रात पूर्वी केलेली अंतर्गत कार्य व त्यानंतर घरी केलेल्या कार्याचे मूल्यमापन होईल. यात अहवाल व स्वाध्याय सादरीकरण होईल. पुन्हा समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली काही व समंत्रण, परीक्षेची तयारी ह्याविषयी मार्गदर्शन करण्यात येईल.

माध्यम

विद्यापीठाने संपूर्ण अध्ययन-साहित्य हे मराठी भाषेत तयार केलेले आहे. त्यामुळे संपूर्ण शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी भाषा राहील. संपर्कसत्रांचे माध्यम मराठी राहील. उत्तरे हिंदी/इंग्रजीतून लिहिण्यासाठी पूर्व परवानगीने देण्यात येईल. अशा प्रशिक्षणार्थींना अंतिम परीक्षेतदेखील हिंदी/इंग्रजीतून उत्तरे लिहिण्याची पूर्व परवानगीने एका माध्यमाचा वापर करता येईल.

२.६ मूल्यमापन प्रक्रिया

(१) हा शिक्षणक्रमाचा एकूण ४०० गुणांचा आहे.

(२) या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन अंतर्गत मूल्यमापन २०% व अंतिम मूल्यमापन ८०% असे करण्यात येईल. अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्याला स्वाध्याय / क्षेत्रीय कार्य / प्रात्यक्षिक कार्य करावे लागेल.

अंतिम परीक्षेपूर्वी विद्यार्थ्याने अंतर्गत कार्य पूर्ण करणे अत्यावश्यक असेल. अंतिम मूल्यमापन म्हणून ४ अभ्यासक्रमांची अंतिम परीक्षा घेण्यात येईव. त्यात ५-५ गुणांचे प्रश्न असतील.

(अ) अंतर्गत मूल्यमापन

विद्यार्थ्याने स्वाध्याय आणि अभ्यासकेंद्र गृह आणि क्षेत्रीय ठिकाणी केलेल्या प्रात्यक्षिक कार्याचे मूल्यमापन केले जाणे अपेक्षित आहे.

(आ) अंतिम मूल्यमापन

अंतिम मूल्यमापनात चार विषयांवर प्रत्येकी ८० गुणांची अंतिम 'लेखी परीक्षा' अंतर्भूत आहे.

(इ) उत्तीर्णतेचे नियम

(१) विद्यार्थ्याने सर्व अंतर्गत कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे.

(२) विद्यार्थ्याने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत कार्य आणि अंतिम परीक्षेचे मिळून किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(३) अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत आणि अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण करून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबतची सूचना

विद्यार्थी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपणास Academic Bank of Credits - ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, पदविका, पदवीची माहिती Digilocker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडिट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits - ID नोंदणी *http://www.abc.gov.in* या पोर्टलवर करता येईल. किंवा आपल्या विद्यापीठाच्या *www.ycmou.ac.in* या वेबसाईट्ला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटणाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits - ID तयार करण्यासंबंधी माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

बालसंगोपन आणि रंजन शिक्षण : शैक्षणिक सत्र जानेवारी २५ अभ्यासकेंद्र यादी

(अध्ययनार्थीने प्रवेश घेण्यापूर्वी अभ्यासकेंद्र निवडी बाबत अभ्यासकेंद्राची खात्री करावी.)

अ.क्र.	विभागीय केंद्र	केंद्र संकेतांक	अभ्यास केंद्राचे नाव , संपूर्ण पत्ता	केंद्र संचालकाचे नाव संपर्क क्र. व ई मेल	केंद्र समन्वयकाचे नाव संपर्क क्र. व ई मेल
१	अमरावती	१२१२३	श्री. दादासाहेब तारे कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन, सुलतानपुरा रोड अचलपुरजि. अमरावती पिन कोड – ४४४८०६	श्री. श्रीपाद कृष्णराव तारे संपर्क : ९४२२१५९४७९/ ७७९८०५४५७९ ई-मेल- shripad.tare@gmail.com	सौ. श्रुती श्रीपाद तारे संपर्क : ९४२३६४८२४८ ई-मेल-shruti.tare@gmail.com
२	अमरावती	११११८	यशोगाथा शिक्षण प्रसारक मंडळ अकोट चे नर्मदाबाई बोडके अध्यापक महाविद्यालय तेल्हारा, जि.अकोला जि.के. कॉलेज जवळ, शेगाव रोड, गाडेगाव, तेल्हारा, जि.अकोला पिन कोड- ४४४१०८	प्रा..डॉ.वैशाली ज.रगडे संपर्क : ८००७६३४०४१ ई-मेल- vaishaliragade2@gmail.com	प्रा..डॉ.वैशाली शा. कंकाळे संपर्क : ९९७५७१६२५९ ई-मेल-kankale26@gmail.com
३	अमरावती	१५१४ A	श्री. मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, यशवंतराव चव्हाण शिक्षण महाविद्यालय, मंगरूळपीर, जि. वाशीम- पिन कोड-४४४४०३	श्री. ओमप्रकाश ज. झिमटे संपर्क : ९७६३००९४५२ ई-मेल-ycbed@rediffimail.com	प्रा. दीपक विजय जयस्वाल संपर्क : ७७७००८४५३४ ई-मेल- ycbeddipakjaiswal@gmail.com
४	अमरावती	१४७३ A	त्यागी सेवा मंडळाच, डॉ बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स गांधीनगर, चर्च जवळ यवतमाळ जि. यवतमाळ पिन कोड-४४५००१	महेंद्र प्रतापसिंह अ. ठकुर संपर्क : ९४२३१३४९१०	डॉ .प्रा.अर्जुन सिंह संपर्क : ९४२२८६५७५५
५	अमरावती	१४१० A	गुणवंतराव देशमुख शिक्षण महाविद्यालय, पुसद जि.यवतमाळ पिन कोड-४४२२१५	प्रा. डॉ. शरद सु.ठाकरे संपर्क : ९४२१८४६३५४ ई-मेल- sharadthakare@gmail.com	प्रा. डॉ. शरद सु.ठाकरे संपर्क : ९६०४५८८१३५, ९८३४३६३०९८ ई-मेल- sharadthakare@gmail.com
६	अमरावती	१२१६९	प्रभात एज्युकेशन सोसायटी खोलापुरी गेट,अमरावती जि.अमरावती पिन कोड-४४४६०१	श्री.विलास दादाराव पवार संपर्क : 9822356953/ ०७२१-२५७०२६१ ई-मेल- v.d.pawar101068@gmail.com	कल्पना फनेंद्र गाहूकर ई-मेल - kfvpawar@gmail.com संपर्क : ९७६७२००९०४
७	अमरावती	१११००	डॉ. नानासाहेब चिंचोळकर ज्युनिअर कॉलेज वाडेगांव. मु.पो.वाडेगाव. ता. बाळापूर. जि.अकोला. पिन कोड. ४४४५०२.	श्री. रवींद्रकुमार वसंतराव मसन संपर्क- ९७६३०३१२८२ मेल - ycmousclllоo@gmail.com	श्री. डॉ. जगदीश दौलतराव चिंचोळकर संपर्क : ९४२३८४८३२५. मेल - jagdishchincholkar@gmail.com
८	अमरावती	१२१३५	स्व. संजय टोम्पे अन्ड स्व. समीर देशमुख कॉलेज ऑफ एज्यूकेशन, चांदूबाजार जि.अमरावती पिन कोड-४४४७०४	प्रा.एस.आर.शेजव संपर्क – ९०४९७०३९१८/०७२२७-२४३००९ ई-मेल- ycmousc१२१३५@gmail.com / istisddsm@rediffmail.com	डॉ.एच.आर.मोहोकार संपर्क – ९९७५६४५७६२ ई-मेल- harish.mohokar@rediffmail.com ycmousc१२१३५@gmail.com

९	अमरावती	१३१७०	अशीरा इंग्लिश स्कूल कळेगाव ता.खामगाव जि.बुलढाणा पिन कोड-४४४३०६	चंद्रप्रभा नामदेव तेल्हारकर संपर्क : ९७६६३३६४३२ ई-मेल- sagar.fundkar86@gmail.com	प्रो. अनिल उत्तम ढगे संपर्क : ७९७२५१०६८७ ई-मेल- anildhage1114@gmail.com
१०	अमरावती	१५२८A	स्व. कु. अर्चनाताई आर्ट्स, कॉमर्स आणि श्री.मनोहरराव नाईक सायन्स कॉलेज कोंडाळा (महाली) ता.जि.वाशिम	प्रा.एस.व्हि.चव्हाण संपर्क : ७०२०३८४३९५	प्रा..एन.व्हि.चव्हाण संपर्क : ९८२२२६४८२४
११	अमरावती	१५२० A	श्री. तुळशिरामजी जाधव कला व वाणिज्य महाविद्यालय, वाशिम जि.वाशिम पिन कोड – ४४४५०५	डॉ. एम. के. गांवड संपर्क : ९४२१८३०७०६ ०७२५२-२३५०५५/८२७५२९८१३९ ई-मेल-stjkm@gmail.com	प्रा. डॉ. इंगोले संपर्क : ९४२३४७५२०३
१२	औरंगाबाद	२११६८	सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, जवाहर कॉलनी, गारखेडा, हेडगेवार रुग्णालय, औरंगाबाद बालवाडी गट न. ४१ उमा गोपाळ नगर कमल नयन बजाज हॉस्पिटल मागे बीड बायपास, सातारा परिसर औरंगाबाद -४३१०१० ई मेल : omkar balvadi96@gmail.com	डॉ.मधुश्री सावजी संपर्क : ९४२२७०१८४७	सौ. माधुरी जगदिश आफळे संपर्क : ९४२३१४९०६० ई-मेल-mjaphale@gmail.com
१३	औरंगाबाद	२३२१A	वसंतराव नाईक अध्यापक कॉलेज ऑफ एज्युकेशन, छत्रपती कॉलनी जालना जि.जालना ४३१२०३	संपर्क : ९४२२२१९८२१	प्रा.अदनाक संपर्क : ९४२१६४८३२०
१४	औरंगाबाद	२११८७	मातोश्री डॉ .कंचन शांतीलाल देसरडा, इन्स्स्टीटयूट, डी.के.एम .एम.कॉलेज कॅम्प्स, गुरुगणेशनगर,पहाडसिंगपुरा औरंगाबाद पिन कोड-४३१००४	प्रा.हसन इसाक इमानदार संपर्क : ९४०५१०९१०३ मो.०२४०- २२४२५४१	प्रा सय्यद शबाना शबरी संपर्क : ९२७०४४६६०३ ई-मेल- maksdwellege @gmail.com
१५	औरंगाबाद	२११०९	विश्वात्मा शिक्षण प्रसारक मंडळाचे वंदे मातरम बालक मंदिर, ६० लेन न. ११, पुंढलिक नगर, गारखेडा परिसर, औरंगाबाद.	श्री. प्रकाश रघुनाथ मोरे संपर्क : ९४०३०८८३९ ई-मेल- prakashraghunathmore@gmail.com	
१६	औरंगाबाद	२२१४१	प्रो.डॉ.विश्वनाथराव कराड बी.एड.कॉलेज केज, टीचर कॉलनी जवळ जि.बीड पिन कोड-४३११२३	प्रो.डॉ.मोरे किशोर चत्रभुज संपर्क : ९८९०५४०८४७ ई-मेल- Ycmousckaij22141@gmail.com	प्रो. कान्हेरे पी.जि. संपर्क : ९७६४८६२०४७ ई-मेल- pravingkanhere@gmail.com
१७	मुंबई	३५३२४	सर शामीन उस्मानिया एज्युकेशनल ॲंड वेलफेअर ट्रस्ट द्वारा रोझरी कॉन्व्हेंट हायस्कूल ॲन्ड जुनिअर कॉलेज, मुम्रा ठाणे पिन कोड-४००६१२	श्री.शाबाद अहमद उस्मानी संपर्क : ९८२१४३३१८८ /०२२- २५४६०७३७/९८७०००९३२९ मेल –rosarychs@rediffmail.com	श्री. सिमाब शमिम उस्मानी संपर्क : ९८७०००९३२९ मेल- rosarychs@rediffmail.com
१८	मुंबई	३७००८	डॉ. शशिकला पोतनीस कला व वाणिज्य महाविद्यालय, पद्मभूषण ताराबाई मोडक विद्या नगरी, कोसबाड हिल ता. डहाणू, जि.पालघर पिन कोड- ४०१७०३	श्री. विरेंद्र नारायण पाटील संपर्क : ९२७३०७७३३५ ई-मेल- patilvirendra98@gmail.com	श्रीमती. संघमित्रा किशनराव भदर संपर्क : ९०२१२८७७०५ ई-मेल-sskolte1985@gmail.com
१९	मुंबई	३७००९	वाडा कॉलेज ऑफ मेनेजमेंट ॲंड सायन्स परळी नाका , मेन रोड वाडा	ऐश्वर्या उल्हास राऊत संपर्क : ८७८८४५४२३० ई-मेल- aishwaryaraut573@gmail.com	मारीया राथोड संपर्क : ८१४९९९३९१० ई-मेल- mariyarathod19@gmail.com
२०	मुंबई	३५३३९	अनिरुद्ध हायस्कूल आणि ज्यू. कॉलेज जयसाई निवास, कीर्ती उद्यानच्या मागे. कात्रप बदलापूर पूर्व, ता.अंबरनाथ, जि.ठाणे पिन कोड- ४२१५०३	दुर्योधन तुकाराम देवकाटे संपर्क : ९८२३११४३१२/ ९७०२२०९१४८ ई-मेल- duryodhandevkate@gmail.com	शशिकला दुर्योधन देवकाटे संपर्क : ९८२३११६६८४ ई-मेल- shashikaladevkate@gmail.com

२१	मुंबई	३२५८ A	यशवंत मेमोरियल ट्रस्ट अशोका गार्डन धूतपापेश्वर आयुर्वेदिक कारखान्याचा बाजूला महात्मा फुले मार्ग पनवेल पिन कोड-४१०२०६	मनोज मुळे संपर्क : ९८१९५४०४४८ ई-मेल-mymuley@gmail.com	विजया ठाकूर संपर्क : ८७९६६६२२८२ ई-मेल-vijya15786@gmail.com
२२	मुंबई	३५२०८	कॉम.जी.एस.पी कॉलेज, तलासरी ता.तलासरी जि.पालघर.	डॉ.बी.ए.राजपूत संपर्क : ८००७१८३९७० ई-मेल- bhagwanrajputexam@gmail.com	प्रो.बी.गोटीस संपर्क : ९४२२०१७६५५ ई-मेल-bhaskargotis@gmail.com
२३	नागपूर	४२११५	स्व सुधाकर नाईक अध्यापक महाविदयाल,चिंचोली खुर्दपो. गोवारी,ता.राजुरा,जि. चंद्रपूर४४२९०५	संपर्क : ८६९८४२७०३२	प्रा सुधीर मुघान्टे संपर्क : ८६९८४२७०३२ ई-मेल- w.prupesh.solnke.@gamil.com
२४	नागपूर	४३०२ A	शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ गडचिरोली संचालित अँड. एन. एस. गंगुवार शिक्षण महाविद्यालय गडचिरोली पिन कोड – ४४१२०८	प्रा. अनिल पांडुरंग नंदेश्वर संपर्क : ९४२३४२२०१७ ई-मेल- anilnandeshwar4@gmail.com	सीमा बाबुराव ठाकरे संपर्क : ९४२२९४११२७ ई-मेल seemathakaresb9@gmail.com
२५	नागपूर	४३२१ A	श्री. किसनराव खोब्रागडे शिक्षण महाविद्यालय बस स्टॅड रोड आरमोरी जि.गडचिरोली- ४४१२०८	डॉ राजेश शा चंदनपाठ संपर्क:- ०७१३२ – २३३२११	कु.वृंदा.दि. मार्लीवार संपर्क:- ९४२१७३०४२३
२६	नागपूर	४४२५०	पालीवाल बी.एड कॉलेज पारशीवनी , नागपूर जि.नागपूर पीन कोड - ४४११०५	प्रा.आशिष पालीवाल संपर्क:- ९८९०२३४७२६ / ०७१२- २७४४९६५/९४२२३४४६४०	ममता शेंडे संपर्क:- ९४२२३४४६४०
२७	नागपूर	४७१४A	श्री विठ्ठल शिक्षण संस्था नागपूर संचालित, यशवंतराव पाटील राऊत अध्यापक विद्यालय,सावरगांव ता.नारखेड जि.नागपूर पिन कोड – ४४१३०४	डॉ.साहेबराव यशवंतराव राऊत संपर्क ९८२३३५०५४४ / 9923859070 ई-मेल- amolakhande@gmail.com	अमोल जनार्धनराव अखंडे संपर्क – ९९२३८५९०७० ई-मेल- amolakhande@gmail.com
२८	नागपूर	४४३४९	पुणे सेवासदन सोसायटी, सीताबर्डी उत्तर अंबाझरी मार्ग नागपूर यशोदाबाई अध्यापिका विद्यालय नॉर्थ अंबाझरी मार्ग सीताबर्डी नागपूर पिन कोड- ४४००१०	श्रीमती चित्रलेखा अडेकर	प्रा. श्री. सतीश एम. पांडे संपर्क:- ९८६०४५८४१०/९६२४१५७३२०
२९	नाशिक	५१११७	आधार ग्रामीण समाजविकास आणि संशोधन संस्था श्रीरामपूर ता.-श्रीरामपूर जि.अहमदनगर पिन कोड- ४१३७०९	सौ.वाघ मनीषा बी. संपर्क:- ९८६०२६८२६० ई-मेल- nashikrc51117@gmail.com/ adhargramin@gmail.com कोकाटे चंद्रकांत ९९७०१०३५१०	
३०	नाशिक	५३१३९	के.सी.ई.सोसायटीचे अध्यापक विद्यालय, जळगाव ता.जि.जळगाव पिन कोड-४२५५००२	डॉ.ए.आर.राणे संपर्क– ०२५७२२२७९५९/ ८४२२२२४६१२ ई-मेल- coe@kces.in	श्रीमती एस.एम.पाटील संपर्क – ०२५७२२२७९५९, ८६००६०२५३० ई-मेल- – ded@kces.in
३१	नाशिक	५३१५ A	लोकमान्य शिक्षण मंडळाच, नविन मराठी शाळा, टाऊन हॉल जवळ, अमळनेर जि.जळगाव पिन कोड- ४२५४०१	प्रा. डॉ. प्रभाकर जगन्नाथ जोशी संपर्क:- ९४२३९३९४५७ ई-मेल- re553155@gmail.com	श्री.सौ.प्रतिमा प्रदिप साळवी संपर्क:- ९८९०७३१४३० ई-मेल- re553155@gmail.com
३२	नाशिक	५४२६८	सी.एच.एम.ई .सोसाईटीचे शिशूविहार बालक मंदीर, रामभूमी,डॉ.बी.एस.मुंजे मार्ग नाशिक पिन कोड – ४२२००५	डॉ.दिलिप गोपाळ बेलगावंकर संपर्क– ०२५३-२३०९६०० ई-मेल- ndchmes_b@rediffmail.com संपर्क-०२५३-२३०९६१६/ ९८८१४९२९८८ ई-मेल- swatikale1967@gmail.com	सौ.स्वाती हेमंत काळे संपर्क - ९८८१४९२९८८ ई-मेल- swatikale@gmail.com
३३	नाशिक	५३१७९	अस्मिता फौंडेशन जळगाव संचलित सौ. सुमनताई पाटील अध्यापक महाविद्यालय पाचोरा जळगाव पिन कोड- ४२४२०१	डॉ.एम.एच.राजपूत संपर्क:- ०२५९६-२४५६४५ ई-मेल- mansingrajput3071@gmail.com digambarpatil1987@gmail.com	

३४	नाशिक	५५१२A	एस.एस.एच. नाईक कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवापूर जि. नंदुरबार		
३५	नाशिक	५११६१	संजीवनी प्रतिष्ठान चे कॉलेज ऑफ एज्युकेशन (बी.एड.), कुरुंड ता.पारनेर जि.अहमदनगर पिन कोड- ४१४३०६	श्री.संभाजी लक्ष्मणराव सोनवणे संपर्क:- ९४२३२४१५३० ई-मेल- spdedkurund@gmail.com kardile39@gmail.com	
३६	नाशिक	५४४६८	सुकेशिनी एज्युकेशन ॲंड रिसर्च इन्स्टीट्युट नाशिकचे इनसाईट रिसर्च सेंटर हिरवे नगर, नाशिक.	डॉ.किशोर चव्हाण एम.एस., पीएचडी, संपर्क:- 9823243303 ई-मेल- Email- insight.nsk@gmail.com	श्रीम. माधुरी नवल पाटील एम.ए., बी.एड. संपर्क:- 9850790613 ई-मेल- dr.ks.chavhan@gmail.com
३७	नाशिक	५३२४०	IQRA कॉलेज ऑफ एज्युकेशन, IQRA एज्युकेशनल कॉम्पलेक्स, मोहाडी शिवार, शिरसोली रोड, जळगाव पिन कोड-४२५-००१ ०२५७-२९५०४०७ email – iqrabedcollegejal@gmail.com mobile No. - ९९२३४४४३८७	प्रो. इरफान इकबाल शेख ई-मेल- irfanshaikh2112@gmail.com संपर्क:- ९९२३४४४३८७ / ७८८५२११५२	प्रो. अझीम अहमद हुसेन शेख
३८	नाशिक	५४४९९	मातोश्री आसाराबाई दराडे महिला कॉलेज ऑफ एज्युकेशन		
३९	पुण	६२५४६	हरकचंद राईचंद बाफना डीएड.कॉलेज वडगाव मावळ पुणे.		
४०	पुण	६४१२८	ग्रामविकास शिक्षक प्रसारक मंडळ अध्यापक विद्यालय सांगोला जि.सोलापूर		
४१	पुण	६३१०५	प्रज्ञा बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण केंद्र,१०, वृंदावन सोसायटी, सहकार नगर पुणे पिन कोड-४११००९	सौ.वैजयंती सिद्धेश्वर देवाळकर ९८६०४५९७२८ ई-मेल- pradnyatte@gmail.com	सौ.जयश्री श्रीकृष्ण घाटगे ९५६१६५२३८९, ७२५३९४४३९५ ई-मेल- jayaghatge@gmail.com
४२	पुण	६२५००	समर्थ ज्ञानपीठ सोमेश्वर नगर संचलित सह्याद्री कॉलेज ऑफ एज्युकेशन वाघळवाडी बारामती जि.पुणे पिन कोड ४१२३०६	अजिंक्य हनुमंतराव सावंत ०२११२-२२२४८९/८८८८५६७०४४ ९८२३१६०९९६ संपर्क- ०२११२ २२२४८९ ई-मेल- reshmaatole5962@gmail.com	रोकडे दयमंती अनिल संपर्क- ९९७०१९८५२२ ई-मेल- damayantirokade@gmail.com
४३	पुण	६५१६६	श्रीमती गीता बनकर महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,सांगोला		
४४	पुण	६५१६७	कै. आमदार काकासाहेब साळुंखे पाटील आर्ट्स & सायन्स कॉलेज		
४५	कोल्हापूर	७१२४४	ज्ञान-विज्ञान माध्यमिक विद्यालय & जुनिअर कॉलेज, बहिरेश्वर		
४६	कोल्हापूर	७११३१	स्व. मारुतीराव विष्णु वारके शिक्षण प्रसारक मंडळ तुरंबे ता.गधानगरी जि.कोल्हापूर पिन कोड-४१६२१२	श्री गौरव शंकरराव वारके संपर्क:- ९८५०९६९०९०	हेमंत एस.वारके संपर्क:- ९९६०३५८५८५
४७	कोल्हापूर	७११९४	तात्यासाहेब मुसळे विद्यालय ॲन्ड ज्युनिअर कॉलेज, इचलकरंजी सांगली रोड, बिग बझार मागे इचलकरंजी ता. हातकलंगे, जि. कोल्हापूर पिन कोड - ४१६११५	श्री. सौ.वैशाली सिध्दाराम काडे संपर्क- ९९२२६८०३६३ ई-मेल- vaishalikade2012@gmail.com संपर्क- ९९२२६८०३६३ ई-मेल- tatyasahebmusale2013@gmail.com	सौ. सुशीला बा. हाळावे संपर्क– ९७६६५५९३२३ सौ स्मिता माने संपर्क:- ८२७५६१११८३५
४८		७२१४३	नवमहाराष्ट्र हायस्कूल आणि जुनिअर कॉलेज सांगली		
४९	नांदेड	८५२२२	माता रत्नेश्वरी सेवाभावी शिक्षण संस्थेचे श्री गुरु गोविंदसोनजी कॉलेज, मु.पो.झरा ता. लोहा जि.नांदेड पिन कोड - ४३१६०६	डॉ.अनिल चिलपिंपरे संपर्क:- ९९२३३५९७७७ ई-मेल- mrssnanded@gmail.com	अशोक मागरे संपर्क:- ९५२७०८४७७७ ई-मेल- sgczari2@gmail.com
५०	नांदेड	८५१६७	शिवशक्ती जुनिअर कॉलेज, मु.पो.काकंडी ता.जि.नांदेड पिन कोड- ४३१६०२	जाधव विपिन लक्ष्मणराव संपर्क:- ९६८९६३५५५३ ई-मेल- vipinjadhav05@gmail.com	गजलवार विश्वनाथ आत्माराम संपर्क:- ९७६४५१२५७५ ई-मेल- vgajjalwar2016@gmail.com

५१	नांदेड	८७१२५	सरस्वती अभ्यासकेंद्र, जवाहर स्कूल रोड जवाहर कॉलनी, जिंतूर ताजिंतूर जि.परभणी पिन कोड- ४३१५०९	डॉ.वरद के.डी. संपर्क:- ९०४९२०५०९० Kdpatil007@gmail.com	वालेकर एस.व्हि. संपर्क:- ९८३४३९१२७५ walekarvb@gmail.com
५२	नांदेड	८५१७A	संस्कार ज्युनिअर कॉलेज पाथरी ता.पाथरीजि.परभणी पिन कोड- ४३१४०१	प्रो.शेजूळ आर.यु. संपर्क:- ८२७५०५८२१४ ई-मेल- ratansheiul@gmail.com	यादव दिलीप संपर्क:- ९५०३६४१५४० ई-मेल- amolkaw222@gmail.com
५३	नांदेड	८४६४ A	श्री.छत्रपती शिवाजी भू ग्रामीण विकास सेवाभावी शिक्षण संस्था किनगाव द्वारा महात्मा फुले महाविद्यालय किनगाव ता. अहमदपूर जि.लातूर पिन कोड-४१३५२३	डॉ.बी.आर. बोडके संपर्क:- ९४२१३८००४८	जाधव यु.एस. चव्हान संपर्क:- ९७६३६१६६६३ ई-मेल- vitthalchavanpatil@yahoo.com
५४	नांदेड	८८२२ A	जिवक अकादमी , रेनबो प्रतिष्ठाण शिवाजीनगर , हिंगोली पिन कोड ४३१५१३	श्रीपाल पाईकराव संपर्क:- ९८२२८८२८४२	प्रा.विजय कांबळे संपर्क:- ९८२२७०९२५४
५५	नांदेड	८८२४ A	संजिवनी बहुउद्देशिय सेवाभावी सोसायटी द्वारा लिटल इंग्लिश स्कूल वसमत, ज्ञानांगण आसेगाव रोड,वसमत जि.हिंगोली पिन कोड- ४३१५१२	श्री नामदेव कोंडबाराव दळवी संपर्क:- ९८५०७६९००० /९८५०६२६०९५ ई-मेल- nkdalvi75@gmail.com	श्री दळवी गोविंद रावसाहेब संपर्क:- ८३०८२५८९९३ /७३८५८१५९८९ ई-मेल- dalvig77@gmail.com
५६	नांदेड	८४१०२	कौशल्याबाई सामाजिक , सास्कृतिक , औद्योगिक पर्यावरण सेवाभावी संस्था , मु.पो. लोणी ता उदगीर लातूर पिन कोड- ४१३५१७	पाटील भगवान लक्ष्मनराव संपर्क:- ९१५८५३८५३५	पाटील अनंतराव लक्ष्मनराव संपर्क:- ९८९०७५२३६६
५७	नांदेड	८७७६A	डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रतिष्ठानचे संस्कृती महाविद्यालय, पूर्णा तहसील कार्यालयाजवळ संस्कृती नगर ता.जि. परभणी पिन कोड- ४३१५११	डॉ.जोंधळे के.व्हि. संपर्क:- ७५८८१६१०१८ ई-मेल- babasahebpurna@gmail.com	भोसले आर.के. संपर्क:- ८००७७४९८५९ ई-मेल- salveganesh76@gmail.com
५८	नांदेड	८४१०१	अहिल्यादेवी महाविद्यालय जळकोट, जळकोट. पो. जळकोट, ता. जळकोट जि. लातूर. पिन कोड-४१३५३२	डॉ. मुरुडकर एम.एस. संपर्क:- .९९२३७८९८५७ ई-मेल- murudkarsudhakar077@gmail.com	साळवे भगवान विश्वनाथ संपर्क:- ९९२३६६२१३४ ई-मेल- salvebhagwan2134@gmail.com
५९	नांदेड	८७१३३	भारतरत्न नानाजी देशमुख अभ्यासकेंद्र, पहिला मजला, मल्हार बिल्डिंग, विद्यानगर नांदखेडा रोड, परभणी पिन कोड - ४३१४०१	डॉ.शिवाजी किशनराव आंबेकर संपर्क:- .९४२३११८७०० ई-मेल- skambekar9@gmail.com	श्रीम. गोदावरी शिवाजीराव आंबेकर संपर्क:- ८३०८१६२६२७ ई-मेल- godavariambekar@gmail.com
६०	नांदेड	८७११९	ज्ञानसाधना ज्युनिअर कॉलेज, मु.पो. धर्मपुरी ता.जिंतूर, जि. परभणी पिन कोड- ४३१४०१	प्रो.चाफे एस.आर. संपर्क:- ९९८८६२०११३ ई-मेल-rschafe9@gmail.com	प्रो.शिंदे के.डी. संपर्क:- ९७६५२०६०८५ shindekeshav92@gmail.com
६१	नांदेड	८५१८५	प्रतिभा प्रतिष्ठान अध्यापक विद्यालय, तळणी ता. जिल्हा नांदेड पिन कोड- ४३१६०५	मुधोळ एस.एस. संपर्क:- ९५६१०२५८४१ ई-मेल- mudhol.sarierao@gmail.com	जळगावकर अ.अ. संपर्क:- ९४०२८२२२५९ ई-मेल- avinashjalgavkar276@gmail.com
६२	नांदेड	८५७७ A	डॉ.बाबासाहेब आंबेडकर मिशन अर्धापूर ता.अर्धापूर जि.नांदेड पिन कोड-४३१६०१	ॲड.सरोदे संपर्क:- ९८२५६८१९९२	

३. स्वयं–सहाय्यता समूह प्रमाणपत्र शिक्षणक्रम (C105) : मूलभूत शिक्षणक्रमाविषयी

स्वयं सहाय्यता समूह संकल्पना दोन दशकांपूर्वी विकसित झाली. सुरुवातीला त्यात बचतीला फार महत्व होते. कालानुरूप या संकल्पनेमध्ये बदल झाले. स्वयं सहाय्यता समूह म्हणजे स्वतःच स्वतःला इतरांची मदत घेऊन सहाय्य करणे होय. त्यातून स्वतः बरोबरच समाजाचा विकासही घडून येतो. समूह विकासातही काळानुरूप विविध दृष्टीकोन वापरले गेले. उदा. कल्याणकारी दृष्टीकोन, विकास दृष्टीकोन इ. आज सबलीकरण हा दृष्टीकोन स्वीकारलेला आहे. यात गरजू आणि दुर्बल घटकांच्या अंगी काही मूलभूत क्षमता असतात यावर विश्वास ठेवून त्या क्षमता विकासासाठी वातावरण निर्मिती करणे हे स्वयं सहाय्यता समूहाचे उद्दिष्ट असते.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने समाजाची ही गरज लक्षात घेऊन स्वयं सहाय्यता समूह शिक्षणक्रमाच्या पुनर्रचनेचे कार्य हाती घेतले. या कार्यात चैतन्य राजगुरुनगर, माविम, एम.एस.आर.एल.एम., नाबार्ड, बायफ अशा ग्रामीण भागाच्या विकासासाठी कार्य करणाऱ्या संस्थांनी बहुमोल सहकार्य केले आहे. या शिक्षणक्रमात स्वयं सहाय्यता समूह बांधणी व संघ यांना जी विविध कामे करावी लागतात त्याबाबतची सविस्तर माहिती दिलेली आहे. हा शिक्षणक्रम सैद्धांतिक अभ्यासक्रम व प्रात्यक्षिक कार्यावर आधरित आहे. शिक्षणक्रम यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या व्यक्तीला स्वयं सहाय्यता समूह तसेच संघाच्या कार्यात यशस्वीपणे कार्य करता येईल.

३.१ उद्दिष्टे

- स्वयं सहाय्यता समूहाची पार्श्वभूमी आणि संकल्पना स्पष्ट होईल.
- स्वयं सहाय्यता समूह व संघांचे गुणवत्तापूर्ण व्यवस्थापन करण्याची क्षमता विकसित होईल.
- स्वयं सहाय्यता समूह आणि संघातील सभासद व पदाधिकारी ह्यांची क्षमता बांधणी करण्याची क्षमता विकसित होईल.
- स्वयं सहाय्यता समूह व संघांचे वित्तीय व्यवस्थापन करता येईल.

३.२ शिक्षणक्रमाची संरचना

(अ) अभ्यास विषय : ४
(आ) किमान कालावधी : ६ महिने
(इ) एकूण श्रेयांक : १६
(ई) एकूण अध्ययन तास : ४८० ते ५६० तास
(उ) एकूण गुण : ४००

३.३ शिक्षणक्रमाचे स्वरूप

प्रस्तुत शिक्षणक्रमाचे दोन मुख्य भाग आहेत –

(अ) तात्त्विक भाग (आ) प्रात्यक्षिक भाग

(अ) तात्त्विक भाग : पाठ्यक्रम

विषय १ : **स्वयं सहाय्यता समूह संकल्पना** (EDU091) Concept of Self Help Group
- घटक १ : स्वयं–सहाय्यता समूहाचे आयाम
- घटक २ : स्वयं सहाय्यता समूहाची तत्वे व प्रकार
- घटक ३ : स्वयं सहाय्यता समूह बांधणी व विकास
- घटक ४ : सामाजिक बदल व स्थानिक विकासात स्वयं सहाय्यता समूहाची भूमिका
- घटक ५ : सहाय्यता संस्था/ आधार संस्था

विषय २ : **स्वयं सहाय्यता समूह व संघाचे गुणवत्तापूर्ण व्यवस्थापन** (EDU092) Qualitative Management of Self Help Group and Federation
- घटक १ : गुणवत्तापूर्ण स्वयं सहाय्यता समूह व्यवस्थापन
- घटक २ : स्वयं सहाय्यता समूहाचे सनियंत्रण व स्वनियंत्रण
- घटक ३ : फेडरेशन/ संघ संकल्पना
- घटक ४ : गुणवत्तापूर्ण संघ व्यवस्थापन ओळख
- घटक ५ : संघ – सनियंत्रण व स्वनियंत्रण

विषय ३ : **सभासद व पदाधिकारी क्षमता बांधणी** (EDU093) Capacity Building of Members and Office Bearers
- घटक १ : स्वयं सहाय्यता समूहातील सभासद व पदाधिकारी
- घटक २ : स्वयं सहाय्यता समूह मूल्यमापन
- घटक ३ : संघातील सभासद व पदाधिकारी
- घटक ४ : संघ मूल्यमापनाचे निकष व पद्धती
- घटक ५ : स्वयं सहाय्यता समूह आणि संघाची स्वयंपूर्णते–कडे वाटचाल

विषय ४ : **वित्तीय नियोजन व व्यवस्थापन** (EDU094) Financial Planning and Management
- घटक १ : स्वयं सहाय्यता समूह व संघांचे वित्तीय नियोजन
- घटक २ : संघाचे वित्तीय व्यवस्थापन
- घटक ३ : आर्थिक प्रतवारी
- घटक ४ : योग्य वित्तीय संस्थेची निवड
- घटक ५ : वित्तीय क्षमता बांधणी

३.४ अध्ययन पद्धती

पारंपरिक विद्यापीठांपेक्षा मुक्त विद्यापीठातील शिक्षणक्रमाची अध्ययन–पद्धती वेगळी आहे. ही पद्धती दूरशिक्षण संकल्पनेवर आधारित आहे. स्वयं अध्ययन करण्यासाठी उपयोगी पडतील अशी स्वयं–अध्ययन पाठ्यपुस्तके आपणाला विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्रामार्फत

पुरविण्यात येतील. सदर अध्ययन साहित्याची सॉफ्टकॉपी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करावा, या शिक्षणक्रमाची भूमिका प्राधान्याने स्वयं-अध्ययनाची असली तरी तात्त्विक विषयांचे मार्गदर्शन, आशयाचे शंकानिरसन, प्रात्यक्षिके, इत्यादी मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनानुसार पूर्ण करावयाची आहेत. स्वाध्याय लेखनानंतर चर्चा, कृतिसत्रे, उद्बोधन, प्रबोधन, इत्यादींसाठी संपर्कसत्रे आयोजित केली जातील. त्याबाबत सविस्तर तपशील वेळोवेळी पत्राने अभ्यासकेंद्रात व प्रशिक्षणार्थींना कळविण्यात येईल.

संपर्कसत्रांचा कार्यक्रम व उपस्थिती

या शिक्षणक्रमासाठी तुमच्या अभ्यासकेंद्रावर एकूण चार संपर्कसत्रे घेण्यात येतील.

(१) उद्‌बोधन/प्रथम सत्र (२ दिवस)

या संपर्कसत्रात मुक्त विद्यापीठ, विद्यापीठातील विविध शिक्षणक्रम, अभ्यासकेंद्र इत्यादींसंदर्भात माहिती आणि सर्व अभ्यास विषयांची ओळख करून देण्यात येईल. तसेच पुढील संपूर्ण कार्यक्रमाचा परिचय करून देण्यात येईल. पहिल्या संपर्कसत्रानंतर घरी व परिसरात करावयाच्या कामाबद्दलची माहिती देण्यात येईल.

(२) द्वितीय संपर्कसत्र (५ दिवस)

ह्या संपर्कसत्रात केंद्रावर तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काही अंतर्गत कार्य पूर्ण करून घेतले जाईल आणि सर्व सैद्धांतिक विषयांचे संमंत्रण होईल. अभ्यासकेंद्रातील प्रात्यक्षिके करून घेण्यात येतील.

(३) तृतीय संपर्कसत्र (२ दिवस)

ह्या संपर्कसत्रात पूर्वी केलेली अंतर्गत कार्य व त्यानंतर घरी केलेल्या कार्याचे मूल्यमापन होईल. पुन्हा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली संमंत्रण व शंका-समाधान केले जाईल. यात संमंत्रण आणि अंतिम परीक्षेच्या दृष्टीने तयारी करून घेण्यात येईल.

टीप : (१) सर्व संपर्कसत्रांसाठी उमेदवारांना येण्याजाण्याची, राहण्याची, जेवणाची व्यवस्था स्वखर्चाने करावी लागेल. अभ्यासकेंद्र ही सोय उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ते सहकार्य करील. सर्व संपर्कसत्रांना उपस्थिती अनिवार्य असेल.

(२) केंद्रावर प्रवेश अत्यंत कमी झाल्यास इतर केंद्रावर प्रवेश वर्ग करण्यात येईल.

३.५ प्रवेश प्रक्रिया

प्रवेश-पात्रता

हा शिक्षणक्रम खालील पात्रता असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस पूर्ण करता येईल.

(१) स्वयं सहाय्यता समूहाचा अनुभव असणारी व्यक्ती.

किंवा

(२) दहावी उत्तीर्ण व १८ वर्षे पूर्ण असणारी कोणतीही व्यक्ती.

एकूण जागा

प्रत्येक अभ्यासकेंद्रावर जास्तीत जास्त ५०अध्ययनार्थींना प्रवेश देण्यात येईल. आवश्यकतेनुसार तुकड्यांची संख्या वाढविण्यात येईल. कमीत कमी ५ अध्ययनार्थी असल्यास अभ्यासकेंद्र सुरू राहील. मात्र परीक्षा केंद्र एकत्रित असेल.

३.६ शिक्षणक्रम शुल्क

तपशील		शुल्क रु.
	Part-A	
१.	नोंदणी शुल्क	२००/-
२.	पात्रता शुल्क	१००/-
३.	ओळखपत्र शुल्क	१०/-
४.	माहितीपुस्तिका शुल्क	५०/-
५.	ई-सुविधा शुल्क	६०/-
६.	ॲल्युमनी शुल्क	१०/-
	Part-B	
१.	विद्यापीठ शुल्क रु.६७० + अभ्यासकेंद्र शुल्क रु.५००/-	१,१७०/-
२.	परीक्षा शुल्क	७२०/-
	एकूण शुल्क	**२,३२०/-**

०१. अध्ययनार्थीने संपूर्ण शुल्क रू. २,३२०/- ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन पद्धतीनेच भरावे.

०२. अभ्यासकेंद्र शुल्क हिस्सा विद्यापीठकडून प्रवेशित अध्ययनार्थीनुसार एकत्रीतपणे पाठवण्यात येईल.

०३. अध्ययनार्थीने वरील शुल्का व्यतिरिक्त जादा शुल्क देऊ नये. जादा शुल्क दिल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची अध्ययनार्थ्यांनी नोंद घ्यावी.

३.७ कालावधी

(१) या शिक्षणक्रमाचा कालावधी किमान सहा महिने व कमाल दोन वर्षांचा असेल.

(२) ज्यांना हा शिक्षणक्रम कमाल कालावधीत (दोन वर्षांत) पूर्ण करता आला नाही त्यांना पुनर्नोंदणी करण्याची संधी उपलब्ध करून दिली जाईल. त्यासाठी त्यावर्षी असणारे या शिक्षणक्रमाचे संपूर्ण शुल्क भरून पुनर्नोंदणी त्या पुढील दोन वर्षांकरिता करता येईल. ही पुनर्नोंदणी फक्त एकदाच करता येईल. (पुनर्नोंदणी कालावधी प्रथम नोंदणी कालावधीची मुदत संपल्याच्या दिनांकापासून मोजण्यात येईल.)

माध्यम

या शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असेल. त्यामुळे पुरविण्यात येणारे सर्व अभ्यास–साहित्य मराठी माध्यमातून पुरविण्यात येईल. मात्र ज्या विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्यासाठी हिंदी वा इंग्रजी माध्यमाचा वापर करावयाचा असेल त्यांना तशी परवानगी देण्यात येईल.

३.८ मूल्यमापन प्रक्रिया

(१) या शिक्षणक्रमाचे मूल्यमापन अंतर्गत मूल्यमापन २०% बहिस्थ मूल्यमापन ८०% असे करण्यात येईल.

(२) अंतर्गत मूल्यमापनासाठी विद्यार्थ्याला स्वाध्याय / क्षेत्रीय कार्य / प्रात्यक्षिक कार्य करावे लागेल.

(३) अंतिम परीक्षेच्या पूर्वी विद्यार्थ्याने अंतर्गत कार्य पूर्ण करणे अत्यावश्यक असते. बहिस्थ मूल्यमापन म्हणून ४ अभ्यासक्रमांची अंतिम परीक्षा घेण्यात येईल. त्यात ५–५ गुणांचे प्रश्न असतील.

उत्तीर्णतेचे नियम

(१) विद्यार्थ्याने सर्व अंतर्गत कार्य पूर्ण करणे आवश्यक आहे.

(२) विद्यार्थ्याने प्रत्येक अभ्यासक्रमाच्या अंतर्गत कार्य आणि अंतिम परीक्षेचे मिळून किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य आहे.

(३) अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत आणि अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण करून अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल.

३.९ अभ्यासकेंद्र

अ.क्र.	*विभागीय केंद्र*	*जिल्हा केंद्र*	*अभ्यासकेंद्र नाव व पत्ता*	*केंद्र संकेतांक*
1	अमरावती	यवतमाळ	डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ डिस्टन्स एज्युकेशन गांधीनगर, यवतमाळ. फोन–07232–241189, 9423134910	1473अ
2	नागपूर	नागपूर	महिला आर्थिक विकास महामंडळ'माविम महिला' प्रांगण, नागपूर प्लॉट नं. पी 62स अ झोन, औद्योगिक वसाहत, बुटीबोरी नागपूर – 441122	44390
3	मुंबई	ठाणे	आदिवासी प्रगती मंडळ, कॉ. गोदावरी परुळेकर महाविद्यालय तलासरी, जि.ठाणे– 401 606 मोबा. 9422017655	35208
4	पुणे	पुणे	चैतन्य ग्रामीण विकास संस्था, राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे फोन–02135–22317,2323226593	63100
5	पुणे	पुणे	लिलावती महिला विकास मंडळ सर्वे नं.14/2,पुणे सोलापूर मार्ग,आकाशमार्ग, टेकवडे पेट्रोलपंपामागे हडपसर, पुणे. फोन–9372134993	62288

Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबतची सूचना

सर्व शिक्षणक्रमाच्या विद्यार्थी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपणास Academic Bank of Credits - ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, पदविका, पदवीची माहिती Digilocker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडिट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits - ID नोंदणी *http://www.abc.gov.in* या पोर्टलवर करता येईल. किंवा आपल्या विद्यापीठाच्या *www.ycmou.ac.in* या वेबसाईटला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटणाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits - ID तयार करण्यासंबंधी माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

६. घरकामगार कौशल्य विकास (E36) प्रमाणपत्र शिक्षणक्रमाविषयी

६.१ प्रास्ताविक शिक्षणक्रमाची आवश्यकता

वाढत्या शहरीकरणामुळे घरकामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. असंघटीत कामगार म्हणून त्यांच्यासाठी शासनानी अनेक कल्याणकारी योजना सुरु केलेल्या आहेत. त्यांची माहिती विविध संघटनांच्या व शासनाच्या माध्यमातून त्यांच्या पर्यंत पोहोचत आहे. याचा लाभही त्यांना व त्यांच्या कुटुंबातील पाल्यांना होत आहे. मात्र घरकाम हे कौशल्य पूर्ण व शास्त्रीय पद्धतीनी करण्यासाठी ज्ञानात्मक व कौशल्य वृद्धीसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने या पूर्वी घरकामगार कल्याण पदविका शिक्षणक्रम एक वर्षाचा सुरु केला होता. तथापी कालावधी व अन्य बाबींची प्रत्यक्ष खातरजमा करून हा शिक्षणक्रम प्रमाणपत्रात करण्यात येत आहे. त्यामुळे घरकामगार करणाऱ्यांना शास्त्रीय दृष्टी प्राप्त होऊन पर्यावरण, जलसाक्षरता व आरोग्यदायी जीवन जगण्याचा मार्ग उपलब्ध होईल असा विश्वास वाटतो.

६.२ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

६.१ घरकाम करणाऱ्या व्यक्तीस व्यावहारिक सुलभ मराठी, हिंदी व इंग्रजी संवाद करण्याची क्षमता विकसित करणे.

६.२ घरकामगार व्यक्तींना स्वतःचे व परिसरातील आरोग्याचे शास्त्रीय ज्ञान देणे.

६.३ घरकामगारांना स्वतःसाठी पोषाहार तयार करण्याच्या सुलभ पाककृती शिकविणे.

६.४ घरकाम कौशल्य क्षमता विकसित करण्यासाठी शास्त्रीय ज्ञान (पर्यावरणशास्त्रीय)आधारे देणे.

६.३ लक्ष्यगट

६.१ घरकाम क्षेत्रात कार्यरत साक्षर व्यक्ती किमान सातवी उत्तीर्ण

६.२ गृहिणी / सुग्रहना

६.३ घरकाम क्षेत्राचे शास्त्रीय ज्ञान घेण्याची आवड असणारी व्यक्ती

६.४ घरकाम क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे कार्यकर्ते इत्यादी

६.४ शिक्षणक्रम संरचना

(अ) अभ्यासक्रम (विषय) : ४

(आ) किमान कालावधी : ६ महिने

(इ) एकूण श्रेयांक : १६

(ई) एकूण अध्ययन तास : ४८० ते ५६० घड्याळी तास

▣ शिक्षणकामाचे स्वरूप

(अ) तात्विक भाग

(आ) प्रात्यक्षिक भाग

EDU 061 घरकामगारांसाठी भाषा संवाद कौशल्ये (मराठी, हिंदी, इंग्रजी)
Language Communication Skill For Domestic Workers (Marathi, Hindi, English)

EDU 062 घरकामागारांसाठी पोषणआहार (Healthy Food for Domestic Workers)

EDU 063 घरकामागारांसाठी आरोग्यशास्त्र (Health Science for Domestic Workers)

EDU 064 घरकामागार कौशल्य विकास (Skill Development for Domestic Workers)

एकूण गुण	**४००**

६.५ अध्ययन पद्धती

मुक्त व दूरशिक्षण संकल्पनेत स्वयं अध्ययन करण्यासाठी उपयुक्त पाठ्यपुस्तके आणि अब्यासकेंद्रावरील संमंत्रणाचा वापर अध्ययनासाठी केलेला आहे. काही प्रमाणात दृकश्राव्य फिती, सरावाणी पेब रेडिओ वरील व्याख्याने व मासिक संवाद पत्रिकेचा वापर या करिता केला आहे. प्रात्यक्षिके, उपकरण हताळणी, क्षेत्रभेट, कृतिसत्रे इत्यादीचे आयोजन अभ्यासकेन्द्रावर वेळोवेळी केलेले जाईल. त्याचा तपशील वेळोवेळी कळविण्यात येईल.

६.६ संपर्कसत्रे

अध्ययनार्थी व अभ्यासकेन्द्राच्या सोईनुसार खालीलप्रमाणे वर्गातील आंतरक्रियासाठी संपर्कसत्रे २७ तास ६ महिन्यात घेण्यात येतील. उपस्थिती ८०% अनिवार्य असेल.

अध्ययन-समंत्रण पद्धती

अ.क्र.	अभ्यासक्रम संकेताक	अभ्यासक्रम	वर्गातील आंतरक्रिया	ई माध्यमातून आंतरक्रिया	कार्यस्थळ कार्यक्षेत्र	प्रयोगशाळा स्टुडिओ	अन्य
१.	EDU 061	घरकामगारांसाठी भाषा संवाद कौशल्ये	९ तास		कार्यस्थळ		संवादपत्रिका
२.	EDU 062	घरकामगारांसाठी पोषाहार	६ तास	यशवाणी	प्रत्यक्ष पाककृती		यशवाणी
३.	EDU 063	घरकामगारांसाठी आरोग्यशास्त्र	६ तास				
४.	EDU 064	घरकामगार कौशल्य विकास	६ तास	क्षेत्रभेट			
एकूण			**२७ तास**				

टीप

(१) संपर्क सत्रांसाठी अध्ययनार्थीस येण्याजाण्याची प्रवासाची व जेवणाची व्यवस्था स्वतः करावी लागेल.

(२) अभ्यास केंद्रावर प्रवेश कमी झाल्यास जवळचे अभ्यासकेंद्र देयात येईल.

७.७ प्रवेश प्रक्रिया

(१) **प्रवेश पात्रता :** किमान मराठी, हिंदी, इंग्रजी लिहिता वाचता येणारी व्यक्ती आणि घरकामक्षेत्रात कार्यरत.

(२) **एकूण प्रवेश क्षमता :** प्रत्येक अभ्यासकेंद्रावर जास्तीत जास्त ५० अध्ययनार्थीस प्रवेश देण्यात येईल. किमान २५ अध्ययनार्थी असल्यास केंद्र सुरु ठेवता येईल. अभ्यासकेंद्राची इच्छा असल्यास कमी अध्ययनार्थी प्रवेश झाले तरी केंद्र सुरू राहील, मात्र वैयक्तिक संमंत्रण करणे अनिवार्य आहे.

७.८ शिक्षणक्रम शुल्क

	तपशील	शुल्क रु.
	Part-A	
१.	नोंदणी शुल्क	२००/-
२.	पात्रता शुल्क	१००/-
३.	ओळखपत्र शुल्क	१०/-
४.	माहितीपुस्तिका शुल्क	५०/-
५.	ई-सुविधा शुल्क	६०/-
६.	ॲल्युमनी शुल्क	१०/-
	Part-B	
१.	विद्यापीठ शुल्क रु.३७० + अभ्यासकेंद्र शुल्क रु.८००/-	११७०/-
२.	परीक्षा शुल्क	१८०/-
एकूण शुल्क		**१७८०/-**

०१. अध्ययनार्थीने संपूर्ण शुल्क रू. १,७८०/- ऑनलाईन प्रवेश अर्ज भरल्यानंतर ऑनलाईन पद्धतीनेच भरावे.

०२. अभ्यासकेंद्र शुल्क हिस्सा विद्यापीठकडून प्रवेशित अध्ययनार्थीनुसार एकत्रीतपणे पाठवण्यात येईल.

०३. अध्ययनार्थीने वरील शुल्का व्यतिरिक्त जादा शुल्क देऊ नये. जादा शुल्क दिल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही याची अध्ययनाथ्यांनी नोंद घ्यावी.

७.९ कालावधी

शिक्षणक्रमाचा कालावधी किमान सहा महिने व कमाल दोन वर्षाचा असेल. ज्या अध्ययनार्थीस हा शिक्षणक्रम दोन वर्षात पूर्ण करता येणार नाही. त्यांना पुनर्नोंदणी करावी लागेल व पूर्ण शुल्क भरावे लागेल.

७.१० माध्यम

या शिक्षणक्रमाचे माध्यम मराठी असेल. त्यामुळे सर्व अध्ययन साहित्य मराठी माध्यमातून असेल. सदर अध्ययन साहित्याची सॉफ्टकॉपी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा वापर करावा. प्रश्नपत्रिका व संपर्क सत्रे ही मराठीतून असतील. तथापी, ज्या अध्ययनार्थीना उत्तरे लिहिण्यासाठी हिंदी व इंग्रजी माध्यम वापरणे सोईचे असेल त्यांना तशी परवानगी विद्यापीठात अर्ज केल्यास मिळू शकेल.

७.११ मूल्यमापन प्रक्रिया

(अंतर्गत आणि अंतिम तसेच मूल्यमापनातील घटक विचारात घेऊन अभ्यासक्रम निहाय किमान उत्तीर्णता निकष तसेच शिक्षणक्रमाचे किमान उत्तीर्णता निकष द्यावेत) : एकूण गुण ४००

क्र.	*संकेतांक*	*अभ्यासक्रम*	*अंतिम लेखी परीक्षा*	*प्रात्यक्षिके व गृहपाठ*	*एकूण*
१.	EDU 061	घरकामगारांसाठी भाषा संवाद कौशल्ये	८०	२०	१००
२.	EDU 062	घरकामगारांसाठी पोषाहार	८०	२०	१००
३.	EDU 063	घरकामगारांसाठी आरोग्यशास्त्र	८०	२०	१००
४.	EDU 064	घरकामगार कौशल्य विकास	८०	२०	१००
एकूण			**३२०**	**८०**	**४००**

प्रत्येक अभ्यासक्रमात किमान ५०% गुण उत्तीर्ण होण्यासाठी अनिवार्य आहेत. तसेच एकत्रित ५०% गुण अनिवार्य आहेत.

क्र.	*श्रेणी व ग्रेड*	*ग्रेड*	
१.	प्रथम श्रेणीत विशेष प्राविण्य	O	७५% व त्या पेक्षा जास्त
२.	प्रथम श्रेणी	A	६०% ते ७४%
३.	द्वितीय श्रेणी	B	५०% ते ५९%
४.	तृतीय श्रेणी	C	४९% पेक्षा कमी नापास

६.१२ अभ्यासकेंद्रे

अ.क्र.	*विभागीय केंद्र*	*जिल्हा*	*अभ्यासकेंद्राचे नाव*	*केंद्र संकेतांक*
१.	नागपूर	नागपूर	इन्स्टिट्यूट ऑफ वुमेन अँड चाईल्ड डेव्हलपमेंट विदर्भ मोलकरीन संघटना सर्वोदय आश्रम, बोले पेट्रोल पंपाजवळ अमरावती मार्ग, नागपूर.	44341
२.	नाशिक	नाशिक	नाशिक जिल्हा घरकामगार मोलकरीन संघटना नाशिक	54341
३.	नांदेड	हिंगोली	जीवक अकादमी रेनबो प्रतिष्ठाण, यचममुवि. अभ्यासकेंद्र, हिलटॉप कॉलनी हिंगोली ४३१५१३	8801A

Academic Bank of Credits-ID तयार करण्याबाबतची सूचना

सर्व शिक्षणक्रमाच्या विद्यार्थी मित्रांनो,

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार आपणास Academic Bank of Credits - ID तयार करणे अनिवार्य आहे. आपण प्राप्त केलेली प्रमाणपत्रे, पदविका, पदवीची माहिती Digilocker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमासाठी क्रेडिट ट्रान्सफर करता येणार नाही. आपणास Academic Bank of Credits - ID नोंदणी *http://www.abc.gov.in* या पोर्टलवर करता येईल. किंवा आपल्या विद्यापीठाच्या *www.ycmou.ac.in* या वेबसाईट्ला भेट द्या. या वेबसाईटवरील Student Zone या बटणाला क्लिक करा. यातील Academic Bank of Credits वर क्लिक केल्यानंतर Academic Bank of Credits - ID तयार करण्यासंबंधी माहिती व PPT सादरीकरण आपणासाठी वेबसाईटवर उपलब्ध केलेले आहे.

संपर्कासाठी पत्ते

(१) **माहितीपुस्तिका :**
विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करावी.
http://ycmou.digitaluniversity.ac

(२) **शिक्षणशास्त्र विद्याशाखा, संचालक**
डॉ. संजीवनी महाले
संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
फोन : (०२५३) २२३१७१४/१५, २२३१४७२

(३) **शैक्षणिक अडचणी सोडविण्यासाठी : शिक्षणक्रम समन्वयक**
१. बालसंगोपन आणि रंजन शिक्षण – डॉ. दयाराम पवार
२. स्वयं–सहाय्यता समूह प्रमाणपत्र : मूलभूत – प्रा. संजीवनी महाले
३. घरकामगार कौशल्य विकास प्रमाणपत्र – प्रा. विजयकुमार पाईकराव
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१४७२

(४) **नोंदणी कक्ष**
श्री. मनोज घंटे
सहायक कुलसचिव
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३१७१५/२२३०५८०

(५) **पुस्तके, अध्ययन–साहित्य बाबत**
श्री. गणेश चव्हाण,
कक्ष अधिकारी,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३०१०७

(६) **परीक्षा अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र बाबत**
डॉ. चंद्रकांत पवार
उपकुलसचिव, परीक्षा कक्ष–१
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२
दूरध्वनी : (०२५३) २२३०७१६

महत्त्वाचे : (१) विद्यापीठाशी करावयाचा सर्व पत्रव्यवहार पोस्टाने अथवा स्पीड पोस्टानेच करावा. खाजगी कुरीअरमार्फत करू नये. (२) अध्ययनसाहित्य विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असेल, आपण पुस्तके मिळेपर्यंत ते डाऊनलोड करून वाचावे.

परिशिष्ट १ : उमेदवार / अध्ययनार्थी करारनामा

उमेदवार / अध्ययनार्थी करारनामा

हा करार अध्ययनार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, अध्ययनार्थी / उमेदवार याने 'Accept' ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल.

या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'अध्ययनार्थी ' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करितो की,

१) त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

२) त्याने ही खात्री करून घेतलेली आहे की, त्याने निवडलेल्या शिक्षणक्रमास तो पात्र आहे आणि जर तो माहितीपुस्तिका आणि / किंवा संगणक पडद्यावर उपलब्ध माहितीप्रमाणे अपात्र ठरत असेल तर त्याचा प्रवेश ताबडतोब रद्द करण्यात येईल आणि त्याने विद्यापीठात भरलेले शुल्क त्यास आंशिक किंवा पूर्ण स्वरूपात परत मिळणार नाही.

३) त्याने त्यास अध्ययन साहित्य (पुस्तके) कोणत्या स्वरूपात (छापील पुस्तके, इ-बुक, मोबाईल ॲप, दृकश्राव्य फिती, ध्वनिफिती सीडीवर किंवा इंटरनेटवर उपलब्ध असलेला मजकूर) उपलब्ध होणार आहे याची माहिती माहितीपुस्तिकेच्या संबंधित भागातून मिळविली आहे. आणि सदर स्वरूपात अध्ययन साहित्य उपलब्ध होणार आहे याबाबत त्याचे कोणतेही आक्षेप नाहीत आणि तो यापुढे कधीही अध्ययन साहित्य माहितीपुस्तिकेत दिलेल्या स्वरूपापेक्षा वेगळ्या स्वरूपात मिळण्याची मागणी करणार नाही.

४) तो यचममुवि संदर्भातील कोणतीही तक्रार किंवा इतर कोणतेही निवेदन त्यास सादर करावयाचे असल्यास अशी तक्रार किंवा निवेदन तो यचममुविमार्फत उपलब्ध असलेल्या संगणकीय प्रणालीचा (युजर आयडीचा) वापर करून करेल. अशी तक्रार किंवा निवेदन तो तक्रार किंवा निवेदनाचे उद्‌भवणाऱ्या कारणांच्या दिनांकाच्या तीस दिवसांच्या आत संगणकीय प्रणालीचा वापर करूनच करेल.

५) त्यास हे मान्य व कबूल आहे की, विद्यापीठाला शिक्षणक्रम राबविण्याच्या नियमांमध्ये, धोरणांमध्ये, अध्ययन साहित्यामध्ये, पाठ्यक्रमात बदल करण्याचा अधिकार आहे आणि अशा नियमांमधील धोरणांमधील, अध्ययन साहित्यामधील, पाठ्यक्रमामधील बदल त्यास बंधनकारक असतील आणि याबाबत त्याची कोणतीही तक्रार असणार नाही.

६) तो शिक्षणक्रमाच्या कालावधीमध्ये विद्यापीठात नोंदविलेल्या त्याच्या भ्रमणध्वनी क्रमांकात बदल करणार नाही.

७) त्यास हे मान्य व कबूल आहे की, त्याने नोंदणीच्या वेळेस विद्यापीठात सादर केलेल्या माहितीत बदल करणे (फोटोग्राफ, भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, पत्ता, इत्यादीसाठी) योग्य ते शुल्क आकारण्याचे अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

८) त्यास हे मान्य व कबूल आहे की, जर विद्यापीठास शासनाकडून (शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांसंदर्भात) त्याचे शुल्क प्राप्त झाले नाही तर अशा अध्ययनार्थ्यांना परीक्षा देण्यास मज्जाव करण्यात येईल आणि जर परीक्षा दिलेली असेल तर त्याचा निकाल तेव्हापर्यंत राखून ठेवण्यात येईल जेव्हापर्यंत त्याचे शुल्क विद्यापीठास प्राप्त होत नाही.

९) त्यास याचीही कल्पना आहे की, त्याच्याकडून कोणतीही असत्य, अपुरी माहिती दिली गेल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल आणि जर त्यास पदवी किंवा पदविका निर्गमित करण्यात आलेल्या असतील तर अशा प्रकारे असत्य, अपूर्ण माहिती मिळाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याची पदवी, पदविका रद्दबातल करण्यात येईल.

१०) तो विद्यापीठाचे संकेतस्थळ (ycmou.digitaluniversity.ac. OR ycmou.ac.in) येथे नियमितपणे भेट देईल आणि तेथे देण्यात आलेल्या शैक्षणिक किंवा प्रशासकीय स्वरूपाच्या सूचनांचे (उदाहरणार्थ, परीक्षा हॉलतिकीट डाऊनलोड करणे आणि त्याची छपाई करणे) काटेकोरपणे पालन करेल.

११) तो विद्यापीठाच्या शिक्षणक्रमाचा अभ्यास अपेक्षित असलेल्या परिश्रम, शिस्त, प्रामाणिकपणे करेल. तसेच आपले वर्तन विद्यापीठाचा सुयोग्य अध्ययनार्थ्याप्रमाणे करेल आणि अशी कोणतीही कृती करणार नाही की जी विद्यापीठाच्या अध्ययनार्थ्यास शोभणार नाही.

परिशिष्ट २ : University Grants Commission Resolution (2004)

विश्वविद्यालय अनुदान आयोग
बहादुरशाह जाफर मार्ग
नई दिल्ली-११० ००२
UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADURSHAH ZAFAR MARG
NEW DELHI-110002

F1-52/2000(CPP-II) 5 MAY 2004

The Registrar / Director
Of all the Indian Universities
(Deemed, State, Central Universities /
Institutions of National importance)

Subject : Recognition of Degrees awarded by Open Universities.

Sir/Madam,

There are a number of open Universities in the country offering various degrees/diploma through the mode of non-formal education. **The Open Universities have been established in the country by an Act of Parliament or State Legislature in accordance with the provisions contained in Section 2(f) of University Grants Commission Act, 1956. These universities are, therefore, empowered to award degrees in terms of Section 22(1) of the UGC Act, 1956.**

A circular was earlier issued vide UGC letter N.F.1-8/92(CPP) dated February, 1992 mentioning that the Certificate, Diplomas and Degrees awarded by Indira Gandhi National Open University are to be treated equivalent to the corresponding awards of the Universities in the country.

Attention is further invited to UGC circular No.F1-25/93(CPP-II) dated 28th July, 1993 (copy enclosed) for recognition of degrees and diplomas as well as transfer of credit for courses successfully completed by students between the two types of universities so that the mobility of students from Open University stream to traditional Universities is ensured without any difficulty.

The UGC has specified the nomenclature of degrees under Section 22(3) of the UGC Act, 1956 to ensure mandatory requirements viz. minimum essential academic inputs required for awarding such degrees. A copy of Gazette Notification regarding specification of degrees issued vide No.1-52/97(CPP-II) dated 31st January 2004 is enclosed. The details are also given in UGC Web site : www.ugc.ac.in

May, I therefore request you to treat the Degrees / Diploma / Certificates awarded by the Open Universities in conformity with the UGC notification on Specification of Degrees as equivalent to the corresponding awards of the traditional Universities in the country.

Yours faithfully

(Dr. Mrs. Pankaj Mittal)
Joint Secretary

Encl. : As Above
Copy to :

1. The Secretary, Government of India, Ministry of Human Resource Development, Department of Secondary Education and Higher Education, Shastri Bhavan, New Delhi-110001.
2. The Secretary, All Indian Council for Technical Education, I.G. Sports Complex, Indraprastha Estate, New Delhi
3. The Secretary, Association of Indian Universities (AIU), 16, Comrade Inderjit Gupta Marg, New Delhi -110002.
4. The Secretary, National Council for Teacher Education, I.G. Stadium, I. P. Estate, New Delhi-110002.
5. The Director of Distance Education Council, IGNOU Campus, Maidan Garhi, New Delhi-110068.
6. The Vice-Chancellor, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi-110068.
7. The Vice-Chancellor, Dr. B. R. Ambedkar Open University, Road, No. 46, Jubilee Hills, Hyderabad (AP)
8. The Vice-Chancellor, Nalanda Open University, West Gandhi Maidan, Patna-800001 (Bihar)
9. The Vice-Chancellor, Dr. Babasaheb Ambedkar Open University, Shahigaug, Ahmedabad-380003 (Gujarat)
10. The Vice-Chancellor, Karnataka State Open University, Manasagangotri, Mysore-570006 (Karnataka)
11. The Vice-Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422222 (Maharashtra)
12. The Vice-Chancellor, Kota Open University, Vardhaman Mahaveer Open University, Kota-324010 (Rajasthan)
13. The Vice-Chancellor, Netaji Subhash Open University, Kolkata-700020 (West Bengal)
14. The Vice-Chancellor, Madhya Pradesh Bhoj (Open) University, Bhopal-462016 (M.P.)

(V.K. Jaiswal)
Under Secretary

परिशिष्ट ३ : G.R. of Equivalency and Approval of State Govt. of Maharashtra for Degree's and Diploma's of Open Universities

मुक्त विद्यापीठाच्या पदव्यांना समकक्षता व शासनमान्यता

(१) अन्य विद्यापीठांच्या पदवीशी समकक्षता

मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्या पत्र क्र. समक (उ. शि.)/१०९४/३२८६१/मवि–१, दि. ३० ऑक्टोबर १९९५ च्या पत्रान्वये 'केंद्रीय किंवा राज्य विधिमंडळाने अधिनियमाद्वारे भारतातील विद्यापीठाने दिलेली पदवी/पदविका आणि संसदेने अधिनियमाद्वारे इतर शैक्षणिक संस्था प्रस्तावित केलेल्या आहेत किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम (१९५६) मधील कलम क्र. ३ अन्वये मानीव विद्यापीठे घोषित केली आहेत अशांच्या बाबतीत पदवी किंवा पदविका मान्यता देण्याबाबतचे औपचारिक आदेश विद्यापीठाने काढण्याची आवश्यकता नाही'.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्याच्या विधिमंडळाने अधिनियमाद्वारे (कायदा क्र. २०/१९८९) स्थापन केलेले विद्यापीठ असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचीही मान्यता आहे. **त्यामुळे या विद्यापीठाची पदवी इतर विद्यापीठांच्या पदवीशी समकक्ष आहे.**

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे पत्र क्र. F/S-15/89 (CPP-I) दि. ८ डिसेंबर १९९२ नुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १९५६ च्या कायद्यातील कलम १२–बी अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मान्यता दिली आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता

उपसचिव व परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांच्या पत्र क्र. १४७७ (१७/१९९४/कक्ष) **दि. १७ फेब्रुवारी १९९४ च्या पत्रातील मान्यतेसंबंधीचा मजकूर – 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे संविधिमान्य (Statutory) असल्यामुळे आपल्या विद्यापीठाच्या पदवीधर अध्ययनार्थ्यांकडून आलेले अर्ज देखील इतर मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवीधर उमेदवारांकडून आलेल्या अर्जांप्रमाणेच आयोगाकडून विचारात घेतले जातील'**

मुक्त विद्यापीठाच्या पदवी/पदविकांना महाराष्ट्र शासन मान्यता

विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेली विद्यापीठे

राज्य सेवेतील पदासांठी पदवी/पदविकास मान्यता

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय : क्रमांक आरजीडी–१३९४/प्र.क्र. २१/९४/१३,मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ८ मार्च १९९५

वाचा : (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरजीडी–१०६१/१८९६७/११४ – जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९

शासन निर्णय : महाराष्ट्र लोक सेवा आयोगाशी विचार विनिमय करून उपरोक्त दिनांक २१ ऑगस्ट १९६९ च्या आदेशाद्वारे असा निर्णय घेण्यात आला होता की, केंद्र अथवा राज्य विधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे स्थापित झालेली विद्यापीठे, संसदेच्या अधिनियमाद्वारे स्थापन झालेल्या इतर शैक्षणिक संस्था, किंवा विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ च्या अंतर्गत भाग ३ अन्वये जाहीर झालेली मानवी विद्यापीठे यांनी प्रदान केलेल्या पदव्या / पदविका तसेच भारतीय वैद्यकीय मंडळ अधिनियम, १९५६ च्या परिशिष्टांमध्ये अंतर्भूत केलेल्या वैद्यकीय व संलग्न विषयामधील पदव्या यांना शासकीय महाविद्यालयातील अध्यापकीय पदे वगळता, **राज्यातील सेवा व पदांवरील भरतीसाठी आपोआप मान्यता प्राप्त झाली असल्याचे समजण्यात यावे.**

(२) सदर आदेशासोबत विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिलेल्या वैधानिक विद्यापीठे व संस्थांची यादी जोडण्यात आली होती. आयोग मान्यताप्राप्त विद्यापीठे व संस्था यांची अद्ययावत यादी आता या आदेशासोबत जोडण्यात आली आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक आरजीडी – १०६१/१८९६७/९१४/जे दिनांक २१ ऑगस्ट १९६९ मध्ये नमूद केलेल्या आणि वर परिच्छेद १ मध्ये उद्धृत केलेल्या हेतूसाठी सदर सर्व विद्यापीठे/संस्था यांनी प्रदान केलेल्या पदवी/पदविकांना आपोआप मान्यता देण्यात आल्याचे समजण्यात यावे.

महाराष्ट्रचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

दा. र. राणे

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

(१) राज्यपालांचे सचिव
(२) मुख्य मंत्र्यांचे सचिव
(३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
(४) महालेखापाल, महाराष्ट्र–१, मुंबई
(५) महालेखापाल, महाराष्ट्र –२, मुंबई
(६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
(७) अभिदान व लेखा अधिकारी, मुंबई
(८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई
(९) प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
(१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
(११) सर्व मंत्रालयीन शिक्षण
(१२) मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख
(१३) अवर सचिव, भारत सरकार, शिक्षण मंत्रालय, नवी दिल्ली
(१४) निवड नस्ती

वाचा : महाराष्ट्र शासनाच्या उपरोक्त शासन निर्णय क्रमांक आर.जी.डी. १३९४/प्र.क्र.२१/९४/१३ मंत्रालय, मुंबई. दिनांक ८ मार्च १९९५ च्या सोबत जोडलेल्या यादीमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांची अनुक्रमांक १४६ वर नोंद करण्यात आलेली आहे.

परिशिष्ट ४ : G.R. of equivalency to 10th and 12th

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक व
राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांची
प्रमाणपत्रे शासनसेवेसाठी समकक्ष म्हणून विचारात घेण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : आरजीडी–१५११/प्र.क्र.८९/१३,
मंत्रालय, विस्तार इमारत, मुंबई–४०००३२
दिनांक : २० मे, २०११.

वाचा

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३९८/प्र.क्र.६७/९८/१३, दिनांक १० डिसेंबर, १९९८.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : आरजीडी–१३०५/प्र.क्र.२४/२००५/१३, दिनांक १२ डिसेंबर, २००६.

शासन निर्णय :

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक येथून प्राप्त केलेली शैक्षणिक अर्हता शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याबाबत सर्वसाधारण सूचना निर्गमित करण्याचे निदेश मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण, मुंबई यांनी श्री. राजेंद्र घुणकीकर विरुद्ध महाराष्ट्र शासन (मूळ अर्ज क्र. ६७०/२००८) वर दिले आहेत. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. ''ज्या पदांच्या सेवाप्रवेश नियमात १० वी/१२ वी (माध्यमिक/उच्च माध्यमिक) परीक्षा उत्तीर्ण असणे अशी किमान अर्हता विहित केलेली असेल त्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण नसलेला मात्र, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला **वा** यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून पदवी धारण केलेला उमेदवार पात्र समजण्यात यावा.''

२. बृहन्मुंबईतील लिपिक–टंकलेखक पदावरील नियुक्तीसाठी विहित करण्यात आलेल्या सेवाप्रवेश नियमातील २ (इ) मध्ये ''महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने नियंत्रित केलेली माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा आणि या परीक्षेस समकक्ष घोषित केलेल्या इतर परीक्षा अंतर्भूत असल्याचे नमूद केले आहे.'' तसेच, उमेदवारांकडे महाराष्ट्र राज्यातील अधिवास प्रमाणपत्र असणेही आवश्यक आहे. राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्थान, नवी दिल्ली या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण केलेल्या एका उमेदवाराने महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकारणाकडे दाखल केलेल्या प्रकरणात (मूळ अर्ज क्रमांक २०४/२०१०) राज्य शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे आदेश दिले आहेत. केंद्र शासनाने कायद्यान्वये स्थापन केलेल्या राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institution of Open Schooling, New Delhi) या विद्यालयाची माध्यमिक शालांत परीक्षा (किमान ५ विषयांसह) उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना शालेय शिक्षण विभागाने अकरावी प्रवेशासाठी पात्र ठरविले आहे. मात्र, शासन सेवेतील नियुक्तीसंदर्भात समकक्षतेबाबत कोणतेही आदेश नाहीत. केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सर्व राज्यांना, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली (National Institute of Open Schooling, New Delhi) यांच्याकडून दिली जाणारी प्रमाणपत्रे उच्च शिक्षण व नोकरीसाठी (Employment) ग्राह्य (समकक्ष) धरण्याबाबत कळविले आहे. ही बाब विचारात घेऊन, राष्ट्रीय मुक्त विद्यालय शिक्षण संस्था, नवी दिल्ली यांच्यामार्फत माध्यमिक शालांत परीक्षेबाबत दिलेले प्रमाणपत्र, माध्यमिक शालांत परीक्षा अशी अर्हता असलेल्या पदांवर नियुक्तीसाठी ग्राह्य धरण्याची बाब देखील शासनाच्या विचाराधीन होती. त्यावर, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार यासंदर्भात खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

''राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली यांची (मराठी व इंग्रजीसह किमान ५ विषयांसह) शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र (Secondary School Examination Certificate) धारण करणाऱ्या उमेदवारांनी, राज्य शासन सेवेमध्ये ज्या ज्या ठिकाणी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी अर्हता विहित केली असेल त्या त्या ठिकाणी शासन सेवेसाठी शालांत परीक्षा समकक्ष पात्रता आपोआप धारण केली आहे असे समजण्यात यावे.''

३. त्यानुसार, सर्व नियुक्ती प्राधिकारी यांनी कार्यवाही करावी. हे आदेश या आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०५२०१३५११०४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बा. वि. निकम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

परिशिष्ट ५ : एका पेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश

DISTANCE EDUCATION COUNCIL
INDIRA GANDHI NATIONAL OPEN UNIVERSITY

15983-16229

F.No.DEC/Notification/40.5.1.5/2012
Dated:01.11.2012

NOTIFICATION

Sub: Policy on pursuing two or more programmes simultaneously in various combinations - regarding.

The Distance Education Council in its 40th meeting held on 08.06.2012 has decided on the policy on pursuing two or more programmes simultaneously in various combinations. Two degree programmes cannot be allowed to be pursued simultaneously. However, a student can pursue two programmes simultaneously through distance or combination of distance and regular modes from the same or different University(ies)/ Institution(s) in various combinations, *viz.*,

1. One Degree and one Diploma/Post Graduate Diploma/Certificate
2. One Post Graduate Diploma and one Diploma/Certificate
3. One Diploma and one Certificate
4. Two Post Graduate Diplomas
5. Two Diplomas
6. Two Certificates

This is for information and adherence by all concerned.

(DIRECTOR)

To

VCs of all SOUs/ Heads of DEIs

3. The Registrar
YCMOU
Dnynagangotri, Near Gangapur Dam
Nashik-422 222,
MAHARASHTRA

परिशिष्ट ६ : Letter of Recognition from UGC

APPENDIX 1

APPENDIX 1.1 : LETTER OF RECOGNITION FROM UGC

UNIVERSITY GRANTS COMMISSION
BAHADUR SHAH ZAFAR MARG
NEW DELHI-110002.

NO. F.5-15/89 (OPP-I) December, 1992

The Secretary
Govt. of Maharashtra
Higher and Technical
Education and Employment Deptt.
Mantralaya Annexe
Bombay- 400032

Sub : Recognition of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, *Nashik for Central assistance under Section 12-B of the UGC Act, 1956.*

Sir,

With reference to the correspondence resting with your letter No. MOJ/ 63003 (241/92) UNI dated 11th November, 1992 on the above subject, I am to say that the University Grants Commission has agreed to declare the Yashwantrao Chavan Maharashtra Open University Nashik established under Maharashtra State Act No. XX of 1989, fit to receive Central assistance for all purposes including Institutional development in terms of the rules framed under Section 12-B of the UGC Act, 1956.

The receipt of the letter may please be acknowledged.

Yours faithfully,

Sd/xxx
(I J GUPTA)
JOINT SECRETARY

Copy to: -

1. The Vice – Chancellor, Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik-422005.
2. Secretary to the Govt. of India, Ministry of Human Resource Development (Deptt. of Education) New Delhi.
3. The Registrar, Indira Gandhi National Open University, Maidan Garhi, New Delhi- 110068.
4. The Secretary, Association of Indian Universities, 16, Kotla Marg, New Delhi- 110002.
5. *Desk Officer (Meeting) / S.O.FD-III/S.O.SU-II/S.S.O.-I, Stat, U.G.C. New Delhi.*
6. All Officers /Sections, UGC New Delhi.

Sd/-
(D. D. Mehta)
SECTION OFFICER

परिशिष्ट ७ : विद्यार्थी सहायता आणि विद्यार्थी कल्याण योजना

* अध्ययनार्थी सहायता

अल्प उत्पन्न गटातल्या हुशार अध्ययनार्थ्यांसाठी अध्ययनार्थी साहाय्य योजना विद्यापीठातर्फे राबविली जाते. त्यासाठी विद्यापीठाने १५ लाखांची तरतूद केली आहे. या योजनेखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल अध्ययनार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या शिक्षणक्रमासाठी असलेल्या शुल्कात सवलत देण्यात येते. त्यासाठी विद्यापीठाने विहित नमुना विकसित केला असून योग्य पात्रताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश शुल्कात सवलत देण्यात येते.

* अध्ययनार्थी कल्याण योजना

अध्ययनार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी दरवर्षी क्रीडा व युवक महोत्सवांचे आयोजन करण्यात येते. तसेच अध्ययनार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी आविष्कार ही संशोधनात्मक स्पर्धाही घेण्यात येत असते.

* क्रीडा महोत्सव

विद्यापीठाच्या अध्ययनार्थ्यांना खेळाचे मैदान मिळावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व विद्यापीठ पातळीवर क्रीडा स्पर्धा सुरू केल्या आहेत. यातून खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धेत भाग घेता येतो. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या आंतरविद्यापीठीय अश्वमेध व ए. आय. यू. च्या क्रीडास्पर्धेतही खेळाडूंना भाग घेता येतो.

* युवक महोत्सव

विद्यापीठाच्या कलावंत अध्ययनार्थ्यांना त्यांच्या कलागुणांचे प्रदर्शन करता यावे म्हणून विद्यापीठाने विभागीय व केंद्रीय स्तरावर युवक महोत्सव सुरू केला आहे. यात वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका, नृत्य संगीत, गायन यांसारख्या स्पर्धा घेण्यात येतात. मा. राज्यपालांच्या कार्यालयाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या इंद्रधनुष्य व ए.आय.यू. (भारतीय विद्यापीठ संघ) यांच्यातर्फे घेण्यात येणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवात कलावंत विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो.

* आविष्कार

विद्यापीठ स्तरावरील अध्ययनार्थ्यांमधील संशोधन प्रवृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी मा. राज्यपाल यांच्या कार्यालयातर्फे दरवर्षी आविष्कार ही संशोधनात्मक स्पर्धा घेण्यात येते. या आंतरविद्यापीठीय संशोधन महोत्सवातही मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना भाग घेता येतो.

* संवाद पत्रिका

राज्यभर पसरलेल्या मुक्त विद्यापीठाच्या अध्ययनार्थ्यांशी संपर्क साधण्यासाठी मुक्त विद्यापीठ संवादपत्रिका हे मासिक प्रकाशित केले जाते. अध्ययनार्थ्यांना उपयुक्त माहिती लेख, सूचना यांचा यात समावेश असतो. अध्ययनार्थ्यांमधील अभ्यासाची प्रेरणा व दूरशिक्षणाबाबत जागरूकता वाढविण्याचे कार्य ही पत्रिका करत असते. सदर संवाद पत्रिका वेबसाईटवर वाचण्यासाठी उपलब्ध असेल.

* आभासी वर्ग

अध्ययनार्थ्यांना उपग्रहाच्या माध्यमातून शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून विद्यापीठाने अहमदाबाद येथील भारत सरकारच्या भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संघटन (इस्रो) या संस्थेच्या मदतीने एज्युसॅट या उपग्रह वाहिनीद्वारा (सॅटेलाईट चॅनल) दूरशिक्षणाचा प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पांतर्गत राज्यात एकूण ४० व्हर्च्युअल लर्निंग सेंटर कार्यान्वित केलेली आहेत. याद्वारे थेट संपर्कसत्रे घेण्यात येतात.

५ राष्ट्रीय सेवा योजना

पारंपरिक विद्यापीठांप्रमाणेच मुक्त विद्यापीठाच्या अध्ययनार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली आहे.

खालील संवर्गातील विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत दिली जाते.

(१) अंध, अपंग, मूक-बधिर, कर्णबधिर अध्ययनार्थी (पाहा परिशिष्ट ३)

(२) विद्यापीठातील नियमित वेतनश्रेणीत कार्यरत सेवक व त्यांचे परिवारजन (स्वतः, पत्नी/पती, दोन पेक्षा अधिक नाही इतके अवलंबून असलेले अपत्य)

(३) मागासवर्गीय (शासनाच्या नियमाच्या अधीन) अध्ययनार्थी.

वरील संवर्गातील उमेदवारांनी संपूर्ण शिक्षणक्रम शुल्क भरून प्रवेश घ्यावा. त्यानंतर विद्यापीठ / शासनाच्या नियमाप्रमाणे शुल्क सवलतीची प्रक्रिया पूर्ण करावी. विद्यापीठ / शासनाच्या नियमाप्रमाणे शुल्काचा परतावा संबंधितांना देण्यात येईल.

परिशिष्ट ८ : अंतिम परीक्षा : प्रश्नपत्रिकेचे स्वरूप

वे ळ : ३ तास **गुण : ८०**

सर्वसाधाण सूचना

१. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
२. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
३. प्रत्येक उप–प्रश्न पाच गुणांचा आहे.
४. प्रत्येक उप–प्रश्नाचे उत्तर ७५–१०० शब्दांत लिहा.

प्रश्न १ : खालीलपैकी कोणतेही चार उप–प्रश्न सोडवा. **(गुण २०)**

(अ) _____
(ब) _____
(क) _____
(ड) _____
(इ) _____

प्रश्न २ : खालीलपैकी कोणतेही चार उप–प्रश्न सोडवा. **(गुण २०)**

(अ) _____
(ब) _____
(क) _____
(ड) _____
(इ) _____

प्रश्न ३ : खालीलपैकी कोणतेही चार उप–प्रश्न सोडवा. **(गुण २०)**

(अ) _____
(ब) _____
(क) _____
(ड) _____
(इ) _____

प्रश्न ४ : खालीलपैकी कोणतेही चार उप–प्रश्न सोडवा. **(गुण २०)**

(अ) _____
(ब) _____
(क) _____
(ड) _____
(इ) _____